नांदेड वाघाळा शहर महानरपालिके अंतर्गत विविध ठरावाचे अनुषंगाने वेगवेगळया विभागांसाठी विविध अभिनामाची कंत्राटी पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरणेबाबत मान्यता प्राप्त झाली असुन सदरची पदे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यात आलेली आहेत. त्यानुसार सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 46 दिनांक 18.03.2011 मनपा, प्राथमिक शाळा जंगमवाडी, महेबुबीया कॉलनीसाठी एक वर्षाकरिता कंत्राटी उर्दु शिक्षक 03 पदांसाठी एक वर्षाकरिता तसेच सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 62 दिनांक 04.07.2012. मनपा, प्राथमिक शाळा जंगमवाडी व महेबुबीया कॉलनी उर्दु माध्यमासाठी-02 प्रा.शा. विष्णुनगरसाठी शिक्षक सेमी इंग्रजी पुर्णवेळ-01 व अर्धवेळ-01 इत्यादी कंत्राटी पदांसाठी मान्यता प्रदान करण्यात आल्यानुसार सदर नियक्त कंत्राटी पदोपैकी सध्या खालीलप्रमाणे तीन कंत्राटी प्राथमिक शिक्षक (उर्दु माध्यम)-03 व कंत्राटी प्राथमिक शिक्षक (सेमी इंग्रजी (पूर्ण वेळ)-01 शिक्षक कार्यरत आहेत.

| अ.क्र. | कंत्राटी कर्मचा-यांचे नांव | पदाचे नांव | एकत्रीत वेतन रुपये | तात्रीक खंड दिनांक | कार्यरत विभागाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| **कंत्राटी प्राथमिक शिक्षक (उर्दु माध्यम) एकत्रीत वेतन रुपये 12,000/-** | | | | | |
| 01 | जवैरीया तजीन मो. इलीयास | **कंत्राटी प्राथमिक शिक्षक उर्दु माध्यम** | 12,000/- | 31.12.2017 | खय्युम प्लॉट शाळा |
| 02 | मौजम खान मुखतार खान | **कंत्राटी प्राथमिक शिक्षक उर्दु माध्यम** | 12,000/- | 31.12.2017 | महेबुबीया कॉ. शाळा |
| 03 | एकबाल फातेमा अ. रहीम | **कंत्राटी प्राथमिक शिक्षक उर्दु माध्यम** | 12,000/- | 31.12.2017 | महेबुबीया कॉ. शाळा |
| **कंत्राटी प्राथमिक शिक्षक (सेमी इंग्रजी पूर्णवेळ) एकत्रीत वेतन रुपये 12,000/-** | | | | | |
| 01 | जाधव मोहन जनकाराम | **कंत्राटी प्राथमिक शिक्षक सेमी इंग्रजी पुर्णवेळ** | 12,000/- | 31.12.2017 | विष्णुनगर शाळा |

सदरील कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवेची मुदत दिनांक 30.12.2017 रोजी संपलेली असून त्यांचे सेवेस दिनांक 31.12.2017 रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.01.2018 ते 29.06.2018 पर्यंत मुदतवाढ देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

तसेच कंत्राटी प्राथमिक शिक्षक उर्दु व सेमि इंग्रजी पुर्णवेळ यांना यापुढे दर सहा महिण्याला एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन पुढील नियमीत सहा महिण्याची मुदतवाढ वाढ देण्याचे अधिकारी मा. महापौर व मा. आयुक्त यांच्या मान्यते देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो

**विषय क्रं.10**

**विषय** :- प्रशासकिय प्रस्ताव

**संदर्भ** :- 1) आयुक्त धुळे महानगरपालिका धुळे यांचे पत्र क्रं. धमपा/आस्था/1325/ दिनांक 03.01.2018

2) श्री पांडुरंग गोमाजी खरोडे याचा अर्ज दिनांक 05.01.2018

श्री पांडूरंग गोमाजी खरोडे यांनी त्यांचे वयोवृध्द आई वडील, लहान भाऊ/बहीण व ईतर सर्व नातेवाईक नांदेड जिल्हयातील डाक्याची वाडी येथे मुळ गावी राहत असुन त्यांचे वृध्द आई वडीलांच्या आजारपणाकडे लक्ष देण्याच्या सोयीसाठी त्यांची सेवा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मध्ये वर्ग करण्याची विनंती केलेली आहे. संबधीतांची धुळे महानगरपालिकेत सरळसेवा जा.क्रं. धुमपा/आस्था/817/दिनांक 05.12.2008 अन्वये शिपाई (अनुसूचीत जमाती) या पदावर आरोग्य विभागात सरळसेवेने नियुक्ती झालेली आहे. संबंधीतांच्या विनंती अर्जानुसार नांदेड वाघाळा महानगरपालिकेत बदलीने शिपाई या रिक्त

पदावर सामावुन घेता येईल किंवा कसे या बाबत आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे यांनी त्यांचे पत्र क्रं. धुमपा/आस्था/1325/ दिनांक 03.01.2018 अन्वये अभिप्राय दयावा अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम 2015 मधील (6) अन्वये एका महानगरपालिकेतुन दुस-या महानगरपालिकेत बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकेतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर संम्मतीने मान्य होतील अशा अटी व शर्तीवर अधिन राहुन बदलीने नियुक्ती देता येईल.

1. पदोन्नतीचे भरण्यात येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करिता राखुन ठेवण्यात आलेल्या रिक्त पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

2. अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकांची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (झिरो सिनिर्यारीटी) राहील.

तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2010/प्र.क्र.210/10/12, दिनांक 03.06.2011 च्या शासन निर्णयात अ.क्रं. 03 नुसार गट क, मधील कर्मचा-यांची विनंतीवरुन / संवर्गाबाहय बदली करण्यासाठी खालील अटी नमुद आहेत.

1. विनंतीवरुन, संवर्गाबाहय, बदली केवळ त्याच पदावर अथवा समकक्ष पदावर करता येईल. अपवादात्मक परिस्थितीत कनिष्ठ (वेतनश्रेणी) वेतनबॅन्ड व ग्रेड पे मधील पदावर बदली करता येईल. मात्र ज्या पदांकरिता विशिष्ठ तांत्रिक व अन्य अर्हता विहित केली असेल व स्वतंत्र निवड प्रक्रिया अवलंबण्यात येत असेल अशा संवर्गाबाहय पदावर बदली अनुज्ञेय होणार नाही.

2. संबंधीत कर्मचा-यांची नियुक्ती नियमीत असावी व त्याला / तिला स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले असावे. संबंधीत कर्मचा-यांची किमान 05 वर्ष सेवा पूर्ण झाली असावी. अपवादात्मक परिस्थतीत हा कालावधी 02 वर्ष इतका शिथील करता येईल म्हणजेच किमान 03 वर्ष सेवा पूर्ण झालेली असल्यास अपवादात्मक परिस्थीती विनंती विचार घेता येईल.

करिता उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री पांडूरंग गोमाजी खरोडे, शिपायी (अनु.जमाती) यांची धुळे महानगरपालिकेतुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड आस्थापनेवर शिपाई या रिक्त पदावर बदलीने नियुक्ती देणेसाठी प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर निर्णयास्तव सादर.

**स. शेर अली** — असे यापुर्वी आलेले प्रस्ताव आहेत ते ही या विषयात समावेश करुन सदरचा विषय पास करण्यात यावा.

**आयुक्त** — हा विषय पास करण्यात यावा. हे शासनाकडे पाठवून शासनाने मंजूरी दिल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**महापौर** — प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.11** **ठराव**

**विषय** :- प्रशासकिय प्रस्ताव

**संदर्भ** :- 1) आयुक्त धुळे महानगरपालिका धुळे यांचे पत्र क्रं. धमपा/आस्था/1325/ दिनांक 03.01.2018

2) श्री पांडुरंग गोमाजी खरोडे याचा अर्ज दिनांक 05.01.2018

श्री पांडूरंग गोमाजी खरोडे यांनी त्यांचे वयोवृध्द आई वडील, लहान भाऊ/बहीण व ईतर सर्व नातेवाईक नांदेड जिल्हयातील डाक्याची वाडी येथे मुळ गावी राहत असुन त्यांचे वृध्द आई वडीलांच्या आजारपणाकडे लक्ष देण्याच्या सोयीसाठी त्यांची सेवा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मध्ये वर्ग करण्याची विनंती केलेली आहे. संबधीतांची धुळे महानगरपालिकेत सरळसेवा जा.क्रं. धुमपा/आस्था/817/दिनांक 05.12.2008 अन्वये शिपाई (अनुसूचीत जमाती) या पदावर आरोग्य विभागात सरळसेवेने नियुक्ती झालेली आहे. संबंधीतांच्या विनंती अर्जानुसार नांदेड वाघाळा महानगरपालिकेत बदलीने शिपाई या रिक्त पदावर सामावुन घेता येईल किंवा कसे या बाबत आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे यांनी त्यांचे पत्र क्रं. धुमपा/आस्था/1325/ दिनांक 03.01.2018 अन्वये अभिप्राय दयावा अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम 2015 मधील (6) अन्वये एका महानगरपालिकेतुन दुस-या महानगरपालिकेत बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकेतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर संम्मतीने मान्य होतील अशा अटी व शर्तीवर अधिन राहुन बदलीने नियुक्ती देता येईल.

1. पदोन्नतीचे भरण्यात येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करिता राखुन ठेवण्यात आलेल्या रिक्त पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

2. अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकांची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (झिरो सिनिर्यारीटी) राहील.

तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2010/प्र.क्र.210/10/12, दिनांक 03.06.2011 च्या शासन निर्णयात अ.क्रं. 03 नुसार गट क, मधील कर्मचा-यांची विनंतीवरुन / संवर्गाबाहय बदली करण्यासाठी खालील अटी नमुद आहेत.

1. विनंतीवरुन, संवर्गाबाहय, बदली केवळ त्याच पदावर अथवा समकक्ष पदावर करता येईल. अपवादात्मक परिस्थितीत कनिष्ठ (वेतनश्रेणी) वेतनबॅन्ड व ग्रेड पे मधील पदावर बदली करता येईल. मात्र ज्या पदांकरिता विशिष्ठ तांत्रिक व अन्य अर्हता विहित केली असेल व स्वतंत्र निवड प्रक्रिया अवलंबण्यात येत असेल अशा संवर्गाबाहय पदावर बदली अनुज्ञेय होणार नाही.

2. संबंधीत कर्मचा-यांची नियुक्ती नियमीत असावी व त्याला / तिला स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले असावे. संबंधीत कर्मचा-यांची किमान 05 वर्ष सेवा पूर्ण झाली असावी. अपवादात्मक परिस्थतीत हा कालावधी 02 वर्ष इतका शिथील करता येईल म्हणजेच किमान 03 वर्ष सेवा पूर्ण झालेली असल्यास अपवादात्मक परिस्थीती विनंती विचार घेता येईल.

करिता उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री पांडूरंग गोमाजी खरोडे, शिपायी (अनु.जमाती) यांची धुळे महानगरपालिकेतुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड आस्थापनेवर शिपाई या रिक्त पदावर बदलीने नियुक्ती देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.11**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती सभा दिनांक 08.01.2018 ठराव क्रं. 64 च्या विरुध्द सर्वसाधारण सभेसमोर अपिल करणे बाबत

**श्री म. अख्तर पि. शेख महेबुब, पुरुष मजुर (प्र. वसुलीकार),** निलंबीत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हे क्षेत्रीय कार्यालय क्रं. 03 येथे पाणी पट्टी वसुलीच्या कामी प्र. वसलीकार म्हणुन कार्यरत असतांना सालसन 2012-13 मध्ये रोखपाल यांच्याकडून वसुली करिता 09 पुस्तके घेतली. घेतलेल्या एकुण 09 पावती पुस्तकात वसुल केलेली रक्कमेची बेरीज केली असता एकूण रक्कम रु. 14,94,520/- वसुल करुन 8,89,440/- रुपये 31 मार्च 2013 पर्यंत भरणा केले असुन उर्वरीत रक्कम 6,11,580/- कार्यालयात भरणा केली नसल्याबाबत श्री असीफ खाँ शेर खाँ प्र. पर्यवेक्षक यांनी अहवाल केला त्यामुळे संबंधीता अपहारीत केलेली रक्कम रु. 6,11,580/- तात्काळ 24 तासाच्या आत जमा करावी तसेच अपहारासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(2) मधील तरतुदीनुसार निलंबीत का करण्यात येवु नये याबाबतचा खुलासा 24 तासाच्या आत स्पष्टीकरणासह सादर करण्या बाबत त्यांना कारणेदाखवा नोटीस देण्यात अली. त्याअनुषंगाने संबंधीतांनी दिनांक 19.08.2013 रोजी खुलासा सादर करुन रु. 85,000/- ही रक्कम भरणा करण्याची परवानगी दयावी व तसेच बाकीची उर्वरीत रक्कम 5,26,580/- दोन तीन किस्तीत दिनांक 31.08.2013 पर्यंत विना विलंब भरणा करेल त्यास मान्यता दयावी असे त्यांनी स्पष्टीकरण सादर केले. तथापित संबंधीतां उर्वरीत रक्कम भरणा केला नसल्यामुळे संबंधीतास कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/32047/14 दि. 07.03.2014 अन्वये निलंबीत करण्यात आले.

निलंबन प्रकरणी संबंधीतांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करुन चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी संबंधीतांविरुध्द ठेवण्यात आलेल्या खालील दोषारोपाची चौकशी केली आहे.

1) नळ जोडणीधारकांकडून वसुल केलेली रक्कम मनपा कार्यालयात न भरता त्या रक्कमेचा अपहार करणे.
2) पाणी कराची वसुलीची सहा पावती पुस्तके कार्यालयात जमा न करणे.
3) नागरीकांकडून रक्कम घेवुन त्यांना पावती न देणे.
4) प्रभागात नेमुन दिलेल्या वार्डात पाणी पुरवठयाची वसुली न करणे.
5) हजेरीपटावर हजेरी करुन इतरत्र फिरणे.

सदर प्रकरणाची चौकशी अधिकारी मनपा, नांदेड यांनी सखोल चौकशी करुन चौकशी अधिकारी यांनी त्यांचेकडे सादर करण्यात आलेले अभिलेखे / दस्तावेज सरकारी साक्षीदार क्रमांक 1, 2 व 3 यांनी नोंदविलेल्या साक्षी, अपचारी कर्मचारी श्री म. अख्तर शेख महेबुब प्र. वसुलीकार यांचा प्रथमिक जबाब व त्यांचे बचावात्मक अंतीम अभिकथन तसेच सादरकर्ता अधिकारी तथा तत्कालीन कार्यालय अधिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड (टाचण) विचारात घेता, अपचारी कर्मचारी श्री म. अख्तर शेख महेबुब, पुरुष मजुर तथा प्र. वसलीकार, मनपा नांदेड यांचेवर जोडपत्र 01 मध्ये ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द झाले असुन संबंधीतांनी पाणी पटटीची वसुली केलेली एकूण रक्कम रु. 7,83,600/- (अक्षरी रुपये सात लाख त्रेऐंशी हजार सहाशे) पैकी मनपा कार्यालयात 7,14,205/- भरणा केली असुन उर्वरीत रक्कम रु. 69,395/- अपहार केल्याचे चौकशी अंती सिध्द झाले आहे. तसेच संबंधीतांनी पाणी कराचे पावती पुस्तक क्रमांक 1) 651, 2) 727, 3) 885, 4) 66, 5) 1032, 6) 1131 अशी सहा पावती पुस्तके कार्यालयात जमा केली नाहीत.

उक्त सर्व बाबी विचारात घेता संबंधीता यापुढे महानगरपालिका सेवेत ठेवणे महापालिकेच्या हिताचे नसल्यामुळे तसेच त्यांचेवरील फौजदारी स्वरुपाचे आरोप पहात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(3) (ब) नुसार त्यांना कारण दाखविण्याची संबंधी देण्याची आवश्यकता नाही अशी नियुक्ती प्राधिका-यांची खात्री झाली असल्याने श्री म. अख्तर पि. शेख महेबुब, पुरुष मजुर यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56(2) (ह) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका सेवेतुन पुढे नौकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल, असा कार्यालयीन आदेश क्रमांक जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/7754/17, दिनांक 01.09.2017 अन्वये कायमचे बडतर्फ करण्यात आले आहे. सदर आदेशाविरुध्द संबंधीतांनी स्थायी समिती,

मनपा यांचेकडे दिनांक 26.09.2017 रोजी अपिल दाखल केले होते. करिता सदरील बडतर्फीचा आदेश रद्दबाबत करता येणार नाही ही बाब स्थायी समितीसमोर प्रशासकीय टिप्पणीव्दारे सादर करण्यात आली होती.

तथापि, प्रशासनाने दिनांक 01.09.2017 रोजी निर्गमीत केलेला बडतर्फीचा आदेश रद्द करुन संबंधीतांस कामावर पुन:स्थापित करणे, तसेच संबंधीताचा बडतर्फी काळ निलंबन काळ करण्याची ही मंजुरी देण्यात येते. तसेच अपिल कर्त्याकडुन वसुल करण्यात येणारी रक्कम रु. 69,395/- व रक्कम रु. 10,00,000/- त्यांचे मासीक वेतनातुन हप्ते पाडुन वसुल करण्यात तसेच अपिलार्थीचे 02 वार्षिक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करण्याची मान्यता मनपा स्थायी समिती सभेने ठराव प्रदान केला आहे.

सदरचा ठराव 64 दिनांक 08.01.2018 हा प्रशासकिय टिप्पणी जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/14356/17 दिनांक 28.12.2017 च्या प्रशासकीय टिप्पणीच्या विरुध्द असुन संयुक्तीक व सनदशीर ठरत नसल्यामुळे प्रशासनाने निर्गमीत केलेला कार्यालयीन आदेश क्रमांक जा.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-3/7754/17 दि. 01.09.2017 अन्वये बडतर्फीचा आदेश हा योग्य आहे. तरी स्थायी समितीचा ठराव रद्द करणेबाबत प्रशासनाच्या वतीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर अपिल निर्णयास्तव ठेवण्यात येते.

**अब्दुल शमीम** स्थायी समितीने जो प्रस्ताव पाठवलेला आहे तो ठराव पास करण्यात यावा. आयुक्तांने जो प्रस्ताव पाठवला आहे तो रदद करण्यात यावा.

**दिपकसिंग रावत** अख्तर सारखे आणखी किती कर्मचारी आहेत त्यांचाही विचार करावा त्याही कर्मचा-यास घेण्यात यावे.

**आयुक्त** या विषयामध्ये इतरांचा समावेश करण्यात येवू नये. केवळ याच विषयापुरता निर्णय घ्यावा. स्थायी समितीने जो निर्णय घेतला आहे त्या निर्णयावर प्रशासनाने सर्व साधारण सभे समोर आलो आहे त्यावर सर्व साधारण सभेने निर्णय घ्यावा.

**अब्दुल शमीम** श्री म. अख्तर पि. शेख महेबुब, पुरुष मजुर (प्र. वसुलीकार) यांना कार्यालयीन आदेश दिनांक 01.09.2017 यांना बडतर्फ करण्यात आले होते सदरच्या आदेशा विरुध्द मनपा स्थायी समिती समोर संबंधीतांनी कामावर घेण्यासाठी अपिल सादर केले असता नावाशमनपा स्थायी समितीने ठराव 64 दिनांक 08.01.2018 नुसार प्रशासनाने दिनांक 01.09.2017 रोजी निर्गमीत केलेला बडतर्फीचा आदेश रद्द करुन संबंधीतांस कामावर पुन:स्थापित करणे, तसेच संबंधीताचा बडतर्फी काळ निलंबन काळ करण्याची ही मंजुरी देण्यात येते. तसेच अपिल कर्त्याकडुन वसुल करण्यात येणारी रक्कम रु. 69,395/- व रक्कम रु. 10,00,000/- त्यांचे मासीक वेतनातुन हप्ते पाडुन वसुल करणे तसेच अपिलार्थीचे 02 वार्षिक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करुन संबंधीतास पुर्नस्थापित करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

तथापि प्रशासनाने मनपा स्थायी समिती ठराव क्रं. 64 दिनांक 08.01.2018 हा रद्द करण्यासाठीचा प्रशासनाचा प्रस्ताव महासभेसमोर सादर केला सदरचा प्रस्ताव रद्द करुन श्री म. अख्तर पि. शेख महेबुब, पुरुष मजुर (प्र. वसुलीकार) यांना मनपा स्थायी समितीने ठराव क्रं. 64 दिनांक 08.01.2018 च्या मान्यतेनुसार संबंधीतास पुर्नस्थापित करण्यास.

**अब्दुल सत्तार** श्री अ.शमीम अब्दुला यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहेत तसेच सदरील कर्मचारी वर उपासमारीची वेळ आलेली आहे जे मनपाचे पैसे होते ते मनपाकडे त्याने भरले आहेत त्यामुळे कामावर घेण्यात यावे. त्यांने 30 वर्षा पासुन सेवा केली आहे.

**सभागृह नेता** कर्मचारी काम करीत असतांना चुका होत असतात. त्यामुळे त्याची एकदाची चुक माफ करुन त्यास कामावर घेण्यात यावे. स्थायी समितीने जो निर्णय घेतला आहे तो निर्णय या ठिकाणी कायम ठेवण्यात यावा. संबधीतास बडतर्फ न करता त्यास कमी शिक्षा लावण्यात यावी तसेच संबधीताने अलिप महापौर महोदयाकडे करावे व त्यास कामावर घेण्यात यावे. याबाबतचे सर्व अधिकार महापौर यांना देण्यात येतात.

**महापौर** श्री अ. शमीम अब्दुला यांनी पुढील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव मांडला श्री म. अख्तर पि. शेख महेबुब, पुरुष मजुर (प्र. वसुलीकार) यांना कार्यालयीन आदेश दिनांक 01.09.2017 यांना बडतर्फ करण्यात आले होते सदरच्या आदेशा विरुध्द मनपा स्थायी समिती समोर संबंधीतांनी कामावर घेण्यासाठी अपिल सादर केले असता नावाशमनपा स्थायी समितीने ठराव 64 दिनांक 08.01.2018 नुसार प्रशासनाने दिनांक 01.09.2017 रोजी निर्गमीत केलेला बडतर्फीचा आदेश रद्द करुन संबंधीतांस कामावर पुन:स्थापित करणे, तसेच संबंधीताचा बडतर्फी काळ निलंबन काळ करण्याची ही मंजुरी देण्यात येते. तसेच अपिल कर्त्याकडुन वसुल करण्यात येणारी रक्कम रु. 69,395/- व रक्कम रु. 10,00,000/- त्यांचे मासीक वेतनातुन हप्ते पाडुन वसुल करणे तसेच अपिलार्थीचे 02 वार्षिक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करुन संबंधीतास पुर्नस्थापित करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

तथापि प्रशासनाने मनपा स्थायी समिती ठराव क्रं. 64 दिनांक 08.01.2018 हा रद्द करण्यासाठीचा प्रशासनाचा प्रस्ताव महासभेसमोर सादर केला सदरचा प्रस्ताव रद्द करुन श्री म. अख्तर पि. शेख महेबुब, पुरुष मजुर (प्र. वसुलीकार) यांना मनपा स्थायी समितीने ठराव क्रं. 64 दिनांक 08.01.2018 च्या मान्यतेनुसार संबंधीतास पुर्नस्थापित करण्यास मान्यता देण्या बाबतचा जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.12** **ठराव**

श्री म. अख्तर पि. शेख महेबुब, पुरुष मजुर (प्र. वसुलीकार) यांना कार्यालयीन आदेश दिनांक 01.09.2017 यांना बडतर्फ करण्यात आले होते सदरच्या आदेशा विरुध्द मनपा स्थायी समिती समोर संबंधीतांनी कामावर घेण्यासाठी अपिल सादर केले असता नावाशमनपा स्थायी समितीने ठराव 64 दिनांक 08.01.2018 नुसार प्रशासनाने दिनांक 01.09.2017 रोजी निर्गमीत केलेला बडतर्फीचा आदेश रद्द करुन संबंधीतांस कामावर पुन:स्थापित करणे, तसेच संबंधीताचा बडतर्फी काळ निलंबन काळ करण्याची ही मंजुरी देण्यात येते. तसेच अपिल कर्त्याकडुन वसुल करण्यात येणारी रक्कम रु. 69,395/- व रक्कम रु. 10,00,000/- त्यांचे मासीक वेतनातुन हप्ते पाडुन वसुल करणे तसेच अपिलार्थीचे 02 वार्षिक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करुन संबंधीतास पुर्नस्थापित करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

तथापि प्रशासनाने मनपा स्थायी समिती ठराव क्रं. 64 दिनांक 08.01.2018 हा रद्द करण्यासाठीचा प्रशासनाचा प्रस्ताव महासभेसमोर सादर केला सदरचा प्रस्ताव रद्द करुन श्री म. अख्तर पि. शेख महेबुब, पुरुष मजुर (प्र. वसुलीकार) यांना मनपा स्थायी समितीने ठराव क्रं. 64 दिनांक 08.01.2018 च्या मान्यतेनुसार संबंधीतास पुर्नस्थापित करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**विषय क्रं.12**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकांतर्गत शहरातील मलवाहीन्यांचे सांडपाणी शहराच्या वेगवेगळया भागातुन पंपिंग करुन बोंढार, इलीचपूर व सांगवी येथील मलशुध्दीकरण केंद्रात प्रक्रिया करुन ते प्रक्रियाकृत पाणी शेतीसाठी सोडले जाते. सद्य:स्थितीत संपूर्ण शहराचे मिळुन प्रक्रियाकृत पाणी 40 द.ल.मि. प्रतिदिवस (MLD) इतके आहे. येत्या तीन ते चार वर्षात सदर प्रक्रियाकृत पाणी 60-70 द.ल.मी. प्रतिदिवस इतके उपलब्ध होणार आहे. सदर प्रक्रियाकृत पाणी परळी येथील विद्युत औष्णिक केंद्रासाठी देण्याबाबत मनपा व महाजनको यांची प्राथमिक स्तरावर बोलणी झालेली आहे व महाजनको यांचे कडून प्रक्रियाकृत पाणी परळी (वै.) येथील औष्णिक विद्युत केंद्रास नेण्यासाठी नांदेड ते परळी (वै.) पर्यंत सर्वेक्षण होवून प्रस्ताव शासनाकडे (उर्जा मंत्रालय) सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके कडून प्रक्रियाकृत पाणी देण्याबाबत शासनाच्या मान्यतेसाठी पत्र व्यवहार झालेला आहे. त्यानूसार शासनाच्या नगरविकास विभागाचे सहसचिव यांनी दिनांक 25.02.2016 च्या पत्रान्वये असे कळविले आहे की शहरातील मलशुध्दीकरण केंद्रातून उत्सर्जीत होणारे प्रक्रिया केलेले पाणी महाजनको परळी औष्णिक केंद्रास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात महाजनको अधिका-यांशी चर्चा करुन आवश्यकतो आराखडा तयार करावा व त्यास महानगरपालिकेच्या मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेवुन ती नागपूर महानगरपालिकेने महाजनकोशी केलेल्या कराराच्या धर्तीवर महानगरपालिकेसाठी फायदेशीर ठरतील. अशी अटी व शर्तीवर आवश्यक करारनामा करुन व शहरातील मलशुध्दीकरण मधून उत्सर्जीत होणा-या प्रक्रियाकृत केलेल्या पाण्याचा 100% पूनर्वापर होईल यासाठी आवश्यकती कार्यवाही तातडीनपे करण्यात यावी.

करिता नागपूर महानगरपालिकेच्या धर्तीवर करारनामा करुन **परळी (वै.)** औष्णिक विद्युत केंद्र यांना प्रक्रिया करुन पाणी देण्याची मान्यता देण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सभागृह नेता** शेतक-याची तहाण भागविण्यासाठी विष्णुपुरी प्रकल्प बांधण्यात आला होता. विष्णुपुरी जलायशातील 50 टक्के पाणी हे पिण्यासाठी वापरण्यात येते. त्यासाठी आपले जे सांड पाणी आहे त्या पाण्याला प्युअर करुन शेतक-यासाठी राखीव राहीले पाहीजे. परळीला हे पाणी दिल्यास या ठिकाणच्या शेतक-यावर अन्याय होईल त्यामुळे हे पाणी परळीला देण्यात येवू नये. हा विषय या सभागृहात फेटाळण्यात येते. पाणी नांदेड जिल्हयातील शेतक-यास मिळाले पाहीजे.

**अब्दुल सत्तार** विष्णुपुरी जलाशयातील पाणी हे शेतक-यासाठी देण्यात आले पाहीजे होते परंतू आता आपण पाणी वापरत आहोत त्यासाठी शेतक-यांना पाणी मिळत नाही म्हणुन सदरचे पाणी परळीला देण्यात येवू नये हा विषय फेटाळण्यात येते.

**किशोर स्वामी** माजी मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी यांच्या समवेत इतर ही पदाधिकारी यांची बैठक मा. मुख्यमंत्री महोदयांनी लावली होती. या बैठकीला तत्कालीन महापौर व मी सुध्दा या बैठकीस उपस्थित होतो, माजी मुख्यमंत्री यांनी सदर फुगीर डीपीआर तयार केले व त्याची कीमंत रु.400 कोटी रुपये एवढी होती त्यामुळे रु.400 कोटीचा निधीचा अपव्यय होईल यासाठी हा प्रस्ताव याच ठीकाणी थांबविण्यात यावा अशी विनंती माजी मुख्यमंत्री महोदयांनी केली होती. मा. मुख्यमंत्री महोदयांनी असे विषय समोर ठेवण्यात येवू नये असे तत्कालीन उर्जा मंत्री यांना सांगीतले होते. हा

विषय मुंबई येथे संम्पलेला होता. या ठिकाणच्या शेतक-यावर अन्याय होईल त्यामुळे हे पाणी परळी देण्यात येवू नये, त्यामुळे हा विषय या ठिकाणी फेटाळण्यात यावा.

**दिपकसिंग रावत** मी जरी भाजपाचा नगरसेवक असलो तरी आणि सभागृहाची भावना लक्षात घेता मी सभागृहा सोबत आहे. आम्ही नांदेड मध्ये राहतो आणि नांदेडच्या जनतेला आम्हाला न्याय दयावयास पाहीजे म्हणून परळीला हे पाणी देण्यात येवू नये. सदरचे पाणी ट्रीटमेट करुन नांदेड जिल्हयातील शेतक-यांना देण्यात यावे. हा ठराव फेटाळण्यात यावा अशी मी सभागृहास विनंती करतो.

**महापौर** श्री किशोर स्वामी यांनी प्रशासनाचा फेटळण्या बाबतचा प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.13** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकांतर्गत शहरातील मलवाहीन्यांचे सांडपाणी शहराच्या वेगवेगळया भागातुन पंपिंग करुन बोंढार, इलीचपूर व सांगवी येथील मलशुध्दीकरण केंद्रात प्रक्रिया करुन ते प्रक्रियाकृत पाणी शेतीसाठी सोडले जाते. सद्य:स्थितीत संपूर्ण शहराचे मिळुन प्रक्रियाकृत पाणी 40 द.ल.मि. प्रतिदिवस (MLD) इतके आहे. येत्या तीन ते चार वर्षात सदर प्रक्रियाकृत पाणी 60-70 द.ल.मी. प्रतिदिवस इतके उपलब्ध होणार आहे. सदर प्रक्रियाकृत पाणी परळी येथील विद्युत औष्णिक केंद्रासाठी देण्याबाबत मनपा व महाजनको यांची प्राथमिक स्तरावर बोलणी झालेली आहे व महाजनको यांचे कडून प्रक्रियाकृत पाणी परळी (वै.) येथील औष्णिक विद्युत केंद्रास नेण्यासाठी नांदेड ते परळी (वै.) पर्यंत सर्वेक्षण होवून प्रस्ताव शासनाकडे (उर्जा मंत्रालय) सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके कडून प्रक्रियाकृत पाणी देण्याबाबत शासनाच्या मान्यतेसाठी पत्र व्यवहार झालेला आहे. त्यानूसार शासनाच्या नगरविकास विभागाचे सहसचिव यांनी दिनांक 25.02.2016 च्या पत्रान्वये असे कळविले आहे की शहरातील मलशुध्दीकरण केंद्रातून उत्सर्जीत होणारे प्रक्रिया केलेले पाणी महाजनको परळी औष्णिक केंद्रास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात महाजनको अधिका-यांशी चर्चा करुन आवश्यकतो आराखडा तयार करावा व त्यास महानगरपालिकेच्या मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेवुन ती नागपूर महानगरपालिकेने महाजनकोशी केलेल्या कराराच्या धर्तीवर महानगरपालिकेसाठी फायदेशीर ठरतील. अशी अटी व शर्तीवर आवश्यक करारनामा करुन व शहरातील मलशुध्दीकरण मधून उत्सर्जीत होणा-या प्रक्रियाकृत केलेल्या पाण्याचा 100% पूनर्वापर होईल यासाठी आवश्यकती कार्यवाही तातडीनपे करण्यात यावी.

**करिता नागपूर महानगरपालिकेच्या धर्तीवर करारनामा करुन परळी (वै.) औष्णिक विद्युत केंद्र यांना प्रक्रिया करुन पाणी देण्यासाठीचा प्रशासनाचा प्रस्ताव हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते फेटाळण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं. 13**

मनपा हद्यीतील NRAP सांडपाणी उपसा केंद्रामध्ये नविन 300 HP पंप सेट बसविण्यासाठी गोदावरी नदीचे प्रदुषण होऊ नये या साठी NRAP (राष्ट्रीय नदी कृती आराखडा) या योजनेतुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण या विभागा मार्फत जुना पुल देगलुर नाका येथे सांड पाणी उपसा केंद्र बांधण्यात आले असुन, या पंप गृहात 150 HP चे दोन पंपसेट व 300 HP चे तीन पंप असून, हे सर्व पंप संच बंद आहेत. प्रत्येकी एक एक पंप सेट दुरुस्त करण्याची कार्यवाही चालु आहे या काळात एक नविन पंपसंट बसविण्याकरिता उप अभियंता पाणी पुरवठा व मलनिस्सासरण विभाग मनपा नांदेड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार कामाची तातडी व गरज आवश्यक्ता लक्षात घेवुन या कामासाठी लागणारा खर्च रुपये 75,12,000/- (अक्षरी रुपये पंचाहत्तर लक्ष बारा हजार फक्त) अपेक्षीत आहे.

करिता सदर खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 क व ड नुसार प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**सभागृह नेता** गेल्या तीन चार महीण्यापासुन हे काम चालू आहे. नदी प्रदुषन टाळण्यासाठी प्रशासनाने चांगले प्रयत्न केले आहे. यावर मा.जिल्हाधिकारी व मा. आयुक्तावर केसेस दाखल केलेल्या आहेत. मा. पर्यावरण मंत्री महोदयांनी हा प्रकल्पासाठी काही निधी मनपास दिला आहे काय हे सांगावे. मोटार घेण्याचा विषय आहे तो पास करण्यात यावा.

**आयुक्त** सदर नदी प्रदुषण टाळण्यासाठी मा. पालकमंत्री महोदय यांचेकडे आपण एक डीपीआर सादर केला आहे. तो डीपीआर पर्यावरण विभागाकडे सुध्दा देण्यात आला आहे त्यास मंजूरी मीळेल अशी अपेक्षा आहे.

**महापौर** प्रशासनाचा प्रस्ताव कार्योत्तर प्रशासकिय आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.14** **ठराव**

मनपा हद्यीतील NRAP सांडपाणी उपसा केंद्रामध्ये नविन 300 HP पंप सेट बसविण्यासाठी गोदावरी नदीचे प्रदुषण होऊ नये या साठी NRAP (राष्ट्रीय नदी कृती आराखडा) या योजनेतुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण या विभागा मार्फत जुना पुल देगलुर नाका येथे सांड पाणी उपसा केंद्र बांधण्यात आले असुन, या पंप गृहात 150 HP चे दोन पंपसेट व 300 HP चे तीन पंप असून, हे

सर्व पंप संच बंद आहेत. प्रत्येकी एक एक पंप सेट दुरुस्त करण्याची कार्यवाही चालु आहे या काळात एक नविन पंपसंट बसविण्याकरिता उप अभियंता पाणी पुरवठा व मलनिस्सासरण विभाग मनपा नांदेड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार कामाची तातडी व गरज आवश्यक्ता लक्षात घेवुन या कामासाठी लागणारा खर्च रुपये 75,12,000/- (अक्षरी रुपये पंचाहत्तर लक्ष बारा हजार फक्त) अपेक्षीत आहे.

करिता सदर खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 क व ड नुसार हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**विषय क्रं.14**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानरपालिका हद्दीत रजिस्ट्री ऑफिस (ITM) ते रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे ब्युटीफिकेशन करणे**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत रजिस्ट्री ऑफिस (ITM) ते रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे ब्युटीफिकेशन करणेसाठी शहरातील रजिस्ट्री ऑफिस ते रेल्वे स्टेशन पर्यंतचा रस्ता सुमारे 10 वर्षापुर्वी करण्यात आला होता. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. फुटपाथवरील पेव्हर कांही ठिकाणी दबले आहेत. लोखंडी रेलींग कांही ठिकाणी तुटली आहे. SW Drain वरील कव्हर फुटले आहेत. रस्ता करतेवेळी Stadium च्या बाजुने अर्ध्या रुंदीमध्ये पेव्हर ब्लॉक बसवुन व उर्वरीत रुंदीत डांबरी रस्ता तयार करण्यात आला होता. परंतु रस्त्याचे पेव्हर ब्लॉक 50% जागी दबले गेले आहेत. त्यामुळे वाहतुकीस कठीण जात आहे. पार्कीगच्या जागी असलेले कर्ब स्टोन नादुरुस्त झालेले आहेत. त्यामुळे रस्ता (ब्युटीफिकेशन) सौंदर्यीकरण करण्यासाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची 2017-18 नुसार रुपये 95,69,600/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत रजिस्ट्री ऑफिस (ITM) ते रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे ब्युटीफिकेशन करणेसाठी लागणारी रक्कम रुपये 95,69,600/- (अक्षरी रुपये पंच्यान्नव लक्ष एकोणसत्तर हजार सहाशे फक्त) `` नविन रस्ते/नविन नाल्या `` या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**महापौर** — प्रशासनाने प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण बाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.15** **ठराव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानरपालिका हद्दीत रजिस्ट्री ऑफिस (ITM) ते रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे ब्युटीफिकेशन करणे**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत रजिस्ट्री ऑफिस (ITM) ते रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे ब्युटीफिकेशन करणेसाठी शहरातील रजिस्ट्री ऑफिस ते रेल्वे स्टेशन पर्यंतचा रस्ता सुमारे 10 वर्षापुर्वी करण्यात आला होता. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. फुटपाथवरील पेव्हर कांही ठिकाणी दबले आहेत. लोखंडी रेलींग कांही ठिकाणी तुटली आहे. SW Drain वरील कव्हर फुटले आहेत. रस्ता करतेवेळी Stadium च्या बाजुने अर्ध्या रुंदीमध्ये पेव्हर ब्लॉक बसवुन व उर्वरीत रुंदीत डांबरी रस्ता तयार करण्यात आला होता. परंतु रस्त्याचे पेव्हर ब्लॉक 50% जागी दबले गेले आहेत. त्यामुळे वाहतुकीस कठीण जात आहे. पार्कीगच्या जागी असलेले कर्ब स्टोन नादुरुस्त झालेले आहेत. त्यामुळे रस्ता (ब्युटीफिकेशन) सौंदर्यीकरण करण्यासाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची 2017-18 नुसार रुपये 95,69,600/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत रजिस्ट्री ऑफिस (ITM) ते रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे ब्युटीफिकेशन करणेसाठी लागणारी रक्कम रुपये 95,69,600/- (अक्षरी रुपये पंच्यान्नव लक्ष एकोणसत्तर हजार सहाशे फक्त) `` नविन रस्ते/नविन नाल्या `` या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.15**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानरपालिका हद्दीत विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक, नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ रस्त्याच्या दुभाजकाची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ रस्त्याच्या दुभाजकाची दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यासाठी सदर रस्ता उत्तर नांदेड शहरातील मुख्य रस्ते असुन विमानतळाला जोडणारा एकमेव रस्ता असल्याने सदर रस्त्याचे सुशोभीकरण करणे आवश्यक असल्याने रस्ता दुभाजकाची दुरुस्ती व रंगरंगोटीचे काम करणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दर सुची 2017-18 नुसार रुपये 51,80,000/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दीत विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक, नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ रस्त्यांच्या दुभाजकाची दुरुस्ती व रंगरंगोटी करणेसाठी लागणारी रक्कम रुपये 51,80,000/- (अक्षरी रुपये एक्यावन्न लक्ष ऐंन्शी हजार फक्त) यास " नविन रस्ते/नविन नाल्या " या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सर्वसासधारण सभेसमोर सादर.

**महापौर** प्रशासनाने प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण बाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.16** **ठराव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानरपालिका हद्दीत विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक, नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ रस्त्याच्या दुभाजकाची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ रस्त्याच्या दुभाजकाची दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यासाठी सदर रस्ता उत्तर नांदेड शहरातील मुख्य रस्ते असुन विमानतळाला जोडणारा एकमेव रस्ता असल्याने सदर रस्त्याचे सुशोभीकरण करणे आवश्यक असल्याने रस्ता दुभाजकाची दुरुस्ती व रंगरंगोटीचे काम करणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दर सुची 2017-18 नुसार रुपये 51,80,000/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दीत विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक, नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ रस्त्यांच्या दुभाजकाची दुरुस्ती व रंगरंगोटी करणेसाठी लागणारी रक्कम रुपये 51,80,000/- (अक्षरी रुपये एक्यावन्न लक्ष ऐंन्शी हजार फक्त) यास " नविन रस्ते/नविन नाल्या " या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.16**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानरपालिका हद्दीत 1) विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक, नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा विमानतळ. (2) आय.टी.आय. ते शिवाजीनगर RUB पर्यंत थर्मोप्लास्टीक पेंट ने सेंटर व साईड लाईन व झेब्रा क्रॉसींग पट्टे मारणे व कॅट आय बसविणे.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत (1) विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ (2) आय.टी.आय. ते शिवाजीनगर **RUB** पर्यंत थर्मोप्लास्टीक पेंट ने सेंटर व साईड व झेब्रा पट्टे मारणे व कॅट आय बसविणेसाठी रस्ते उत्तर नांदेड शहरातील मुख्य रस्ते असुन विमानतळ व दक्षीण नांदेड शहराला जोडणारे मुख्य रस्ते असल्याने सदर रस्त्याचे सुशोभीकरण तसेच वाहतुक व्यवस्था सुरळीत करणे आवश्यक असल्यामुळे सदर रस्त्यांवर थर्मोप्लास्टीक पेंटने सेंटर व साईड लाईन व झेब्रा क्रॉसींग पट्टे मारणे व कॅट आय बसविण्याचे काम करणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची 2017-18 नुसार रुपये 77,03,855/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत (1) विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ (2) आय.टी.आय. ते शिवाजीनगर **RUB** पर्यंत थर्मोप्लास्टीक पेंट ने सेंटर व साईड व झेब्रा पट्टे मारणे व कॅट आय बसविणेसाठी लागणारी रक्कम रुपये 77,03,855/- (अक्षरी रुपये सत्याहत्तर लक्ष तीन हजार आठशे पंचाव्वन फक्त) यास " नविन रस्ते/नविन नाल्या " या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सर्वसासधारण सभेसमोर सादर.

**सभागृह नेता** शहरात प्रमुख रस्त्याचे कामे झालेली आहेत चौकाचे ठिकाणी काम दिसत आहे. शहरात काही तरी झाले आहे अशी सर्वांची भावना झालेली आहे. गुरु-ता-गददी नंतर प्रथमच शहरातील रेलींगची रंगरंगाटी करण्यात येत आहे ती करण्यात यावी. संगत गुरुव्दारासाठी यात्रेकरु येतात तोही रस्ता करणे आवश्यक आहे. इतरही शहरातील लहान लहान रस्ते दुस-या टप्प्यात घेणे आवश्यक आहे.

**स. शेर अली** आपण जी कामे केली आहे ती कामे अत्यंत अभिनंदनिय आहेत यात शंका नाही. आता बीजी महाराज यांनी सांगीतल्याप्रमाणे रस्ता क्रमाक 24 हा श्री पवळे, बिजी महाराज व माझ्या प्रभागातुन जातो. याही रस्तेचे काम करावे.

**वैशाली देशमुख** म.फुले चौक, गणेशनगर, पावडे वाडी नाका ते मोर चौक ते छत्रपती चौक हा रस्ता देखील करण्यात यावा अशी आपणास विनंती आहे.

**अब्दुल सत्तार** जुन्या शहराचा एकही रस्ता केलेला नाही सभापती साहेब यांच्या वार्डातील रस्ता तरी घ्यावावयास पाहीजे होता ते रस्ता का घेण्यात आले नाही. संगत गुरुव्दारास जाणारा रस्ता फार महत्वाचा आहे. हा विषय पेडींग ठेवण्यात यावा.

**फारुख अली खाँ** हा विषय पेडींग ठेवण्यात येवू नये पास करण्यात यावा. इतरही रस्ते करावे अशी आमची मागणी आहे.

बराच वेळ गोंधळ चालू होता.

**अब्दुल सत्तार** जुन्या शहराचा एकही रस्ता केलेला नाही संगत गुरुव्दारास जाणारा रस्ता फार महत्वाचा आहे. हा का रस्ता घेतला नाही असे सांगावे.

**सभागृह नेता** इतर ही रस्त्याचे निविदा काढण्यात याव्यात हा विषय पास करण्यात यावा.

**आयुक्त** जे रस्ते घेण्यात आले आहेत त्या रस्त्यामुळे शहराची लुकींग दिसणार आहे. याकरीता हे रस्ते प्रस्तावित केले आहे. आपल्या ज्या सुचना आहेत त्या माझ्या कडे देण्यात याव्यात त्यानुसार ते रस्ते पण करण्यात येतील त्याला निधीची कमी पडू देणार नाही. हे माझे आपणास आश्वासन आहे.

**महेंद्र पिंपळे** अख्या महाराष्ट्रातून माझ्या प्रभागात मुले शिक्षण घेण्यासाठी येतात. त्यासाठी भाग्यनगरचा रस्ता घेण्यात यावा.

**भानुसिंग रावत** ओल्ड सिटीचे रस्ते महत्वाचे नाहीत काय. हबीब टॉकीज ते महाविर चौक हा रस्ता महत्वाचा नाही काय हे सांगावे. या रस्त्याचा का समावेश केला नाही. याचा प्रथम खुलासा करावा. ठराविक एरीयाच्या रस्त्याकडे आपण लक्ष दिले आहे, असे दिसुन येत आहे. गणेश टॉकीजच्या रस्त्यावर जावून पहावे तो रस्ता कीती खराब झालेला आहे. तो का रस्ता का घेण्यात आला नाही हे स्पष्ट करावे.

**महापौर** प्रशासनाने प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण बाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.17** **ठराव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानरपालिका हद्यीत 1) विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक, नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा विमानतळ. (2) आय.टी.आय. ते शिवाजीनगर RUB पर्यंत थर्मोप्लास्टीक पेंट ने सेंटर व साईड लाईन व झेब्रा क्रॉसींग पट्टे मारणे व कॅट आय बसविणे.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत (1) विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ (2) आय.टी.आय. ते शिवाजीनगर **RUB** पर्यंत थर्मोप्लास्टीक पेंट ने सेंटर व साईड व झेब्रा पट्टे मारणे व कॅट आय बसविणेसाठी रस्ते उत्तर नांदेड शहरातील मुख्य रस्ते असुन विमानतळ व दक्षीण नांदेड शहराला जोडणारे मुख्य रस्ते असल्याने सदर रस्त्याचे सुशोभीकरण तसेच वाहतुक व्यवस्था सुरळीत करणे आवश्यक असल्यामुळे सदर रस्त्यांवर थर्मोप्लास्टीक पेंटने सेंटर व साईड लाईन व झेब्रा क्रॉसींग पट्टे मारणे व कॅट आय बसविण्याचे काम करणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची 2017-18 नुसार रुपये 77,03,855/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत (1) विमानतळ, राज कॉर्नर, आय.टी.आय. ते आण्णाभाऊ साठे चौक नमस्कार चौक, माळटेकडी गुरुव्दारा, विमानतळ (2) आय.टी.आय. ते शिवाजीनगर **RUB** पर्यंत थर्मोप्लास्टीक पेंट ने सेंटर व साईड व झेब्रा पट्टे मारणे व कॅट आय बसविणेसाठी लागणारी रक्कम रुपये 77,03,855/- (अक्षरी रुपये सत्याहत्तर लक्ष तीन हजार आठशे पंचाव्वन फक्त) यास `` नविन रस्ते/नविन नाल्या `` या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.17**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानरपालिका हद्यीत 1) रेल्वे स्टेशन ते महावीर चौक (2) हुतात्मा स्मारक ते वजीराबाद (3) शिवाजी पुतळा ते हिंगोली गेट RUB व स्टेशन रोड BT रस्त्याचे डांबरीकरणाने मजबुतीकरण करणे.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत (1) रेल्वे स्टेशन ते महावीर चौक (2) हुतात्मा स्मारक ते वजीराबाद (3) शिवाजी पुतळा ते हिंगोली गेट RUB व स्टेशन रोड BT रस्त्याचे डांबरीकरणाने मजबुतीकरण यापुर्वी सुमारे दहा वर्षापुवी सालसन 2008 गुरु-ता-गद्दी कार्यक्रम अंतर्गत नुतनीकरण करण्यात आले होते. सदर रस्ते हे नांदेड शहरातील अत्यंत महत्वाचे कार्यालय, गुरुव्दारा, पुतळे, रेल्वे स्टेशन, न्यायालय, पोस्ट ऑपिस, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, वन विभाग, वजिराबाद मुख्य बाजार पेठ यांना जोडणारे रस्ते आहेत. पाऊसामुळे व सतत वाहनांच्या वर्दळीमुळे ब-याच ठिकाणी भुमिगत Electric Cabeling / BSNL Cebeling व पाणी पुरवठा लाईन, ड्रेनेज लाईनच्या दुरुस्तीचे काम केल्यामुळे रस्त्यावर ब-याच ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. सुमारे 70 ते 90% Surface Black Top (BT) उखडून रस्ते वाहतुकीसाठी नादुरुस्त झालेले आहेत. त्यामुळे सदरचे काम

करणे अत्यंत आवश्यक असल्याने या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दर सुची 2017-18 नुसार रुपये 97,60,691/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत (1) रेल्वे स्टेशन ते महावीर चौक (2) हुतात्मा स्मारक ते वजीराबाद (3) शिवाजी पुतळा ते हिंगोली गेट RUB व स्टेशन रोड प्रभाग क्रं. 17 मधील BT रस्त्याचे डांबरीकरणाने मजबुतीकरण करणेसाठी लागणारी रक्कम रुपये 97,60,691/- (अक्षरी रुपये सत्यान्नव लक्ष साठ हजार सहाशे एक्यान्नव फक्त) यास `` नविन रस्ते/नविन नाल्या `` या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सर्वसासधारण सभेसमोर सादर.

**महापौर** प्रशासनाने प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण बाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.18** **ठराव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानरपालिका हद्यीत 1) रेल्वे स्टेशन ते महावीर चौक (2) हुतात्मा स्मारक ते वजीराबाद (3) शिवाजी पुतळा ते हिंगोली गेट RUB व स्टेशन रोड BT रस्त्याचे डांबरीकरणाने मजबुतीकरण करणे**.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत (1) रेल्वे स्टेशन ते महावीर चौक (2) हुतात्मा स्मारक ते वजीराबाद (3) शिवाजी पुतळा ते हिंगोली गेट RUB व स्टेशन रोड BT रस्त्याचे डांबरीकरणाने मजबुतीकरण यापुर्वी सुमारे दहा वर्षापुवी सालसन 2008 गुरु-ता-गद्दी कार्यक्रम अंतर्गत नुतनीकरण करण्यात आले होते. सदर रस्ते हे नांदेड शहरातील अत्यंत महत्वाचे कार्यालय, गुरुव्दारा, पुतळे, रेल्वे स्टेशन, न्यायालय, पोस्ट ऑपिस, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, वन विभाग, वजिराबाद मुख्य बाजार पेठ यांना जोडणारे रस्ते आहेत. पाऊसामुळे व सतत वाहनांच्या वर्दळीमुळे ब-याच ठिकाणी भुमिगत Electric Cabeling / BSNL Cebeling व पाणी पुरवठा लाईन, ड्रेनेज लाईनच्या दुरुस्तीचे काम केल्यामुळे रस्त्यावर ब-याच ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. सुमारे 70 ते 90% Surface Black Top (BT) उखडून रस्ते वाहतुकीसाठी नादुरुस्त झालेले आहेत. त्यामुळे सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दर सुची 2017-18 नुसार रुपये 97,60,691/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत (1) रेल्वे स्टेशन ते महावीर चौक (2) हुतात्मा स्मारक ते वजीराबाद (3) शिवाजी पुतळा ते हिंगोली गेट RUB व स्टेशन रोड प्रभाग क्रं. 17 मधील BT रस्त्याचे डांबरीकरणाने मजबुतीकरण करणेसाठी लागणारी रक्कम रुपये 97,60,691/- (अक्षरी रुपये सत्यान्नव लक्ष साठ हजार सहाशे एक्यान्नव फक्त) यास `` नविन रस्ते/नविन नाल्या `` या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 18**

**विषय :- नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका हद्यीत सिडको भागात वसंतराव नाईक कॉलेज ते ढवळे कॉर्नर पर्यंत डांबरी रस्ता व आर.सी.सी. नाली करणे बाबत**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत सिडको भागात वसंतराव नाईक कॉलेज ते ढवळे कॉर्नर पर्यंत डांबरी रस्ता व आर.सी.सी. नाली करण्यासाठी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता, सदर ठिकाणी पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागाने वाहीणी टाकण्याचे काम केल्यामुळे सदरील रस्ता पुर्ण पणे खराब झालेला आहे सदरील रस्ता व रस्त्याच्या ठिकाणी आर.सी.सी. नाली करणे आवश्यक आहे. सदरील रस्त्याचा कामासाठी स्थानिक नगरसेवक व भागातील नागरीकांची पण रस्ता व नाली करण्यासाठी मागणी असल्याने या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दर सुची 2017-18 नुसार रुपये 2,36,24,920/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहरा महानगरपालिका, हद्यीत सिडको भागात वसंतराव नाईक कॉलेज ते ढवळे कॉर्नर पर्यंत डांबरी रस्ता व आर.सी.सी. नाली करणेसाठी लागणारी रक्कम रुपये 2,36,24,920/- (अक्षरी रुपये दोन कोटी छेत्तीस लक्ष चोवीस हजार नऊशे वीस फक्त) यास **नविन रस्ते/नविन नाल्या** या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**महापौर** प्रशासनाने प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण बाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.19** **ठराव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका हद्यीत सिडको भागात वसंतराव नाईक कॉलेज ते ढवळे कॉर्नर पर्यंत डांबरी रस्ता व आर.सी.सी. नाली करणे बाबत**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत सिडको भागात वसंतराव नाईक कॉलेज ते ढवळे कॉर्नर पर्यंत डांबरी रस्ता व आर.सी.सी. नाली करण्यासाठी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता, सदर ठिकाणी पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागाने वाहीणी टाकण्याचे काम केल्यामुळे सदरील रस्ता पुर्ण पणे खराब झालेला आहे सदरील रस्ता व रस्त्याच्या ठिकाणी आर.सी.सी. नाली करणे आवश्यक आहे. सदरील रस्त्याचा कामासाठी स्थानिक नगरसेवक व भागातील नागरीकांची पण रस्ता व नाली

करण्यासाठी मागणी असल्याने या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दर सुची 2017-18 नुसार रुपये 2,36,24,920/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

नांदेड वाघाळा शहरा महानगरपालिका, हद्यीत सिडको भागात वसंतराव नाईक कॉलेज ते ढवळे कॉर्नर पर्यंत डांबरी रस्ता व आर.सी.सी. नाली करणेसाठी लागणारी रक्कम रुपये 2,36,24,920/- (अक्षरी रुपये दोन कोटी छेतीस लक्ष चोवीस हजार नऊशे वीस फक्त) यास **नविन रस्ते/नविन नाल्या** या लेखाशिर्षका खालील तरतुदीतुन सुधारीत अंदाजपत्रकाच्या अधिन राहुन सालसन 2017-18 च्या प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 19**

**वाचा:-**1. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी 1091/3456/प्र.क्र.320/91/आ-7,दि.14.01.1993

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-1099/प्र.क्र.40/आ- 3 ,दि. 29.07.1999
3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-1099/प्र.क्र.40/आ-3,दि. 25.02.2000
4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-1095/प्र.क्र.45/95/आ-3,दि. 04.04.2000
5. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-1099/1333/प्र.क्र.201/आ-3,दि. 29.11.2004
6. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-2005/9/प्र.क्र.1/आ-3,दि. 19.03.2005
7. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2,दि. 16.11.2011
8. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र. वैखप्र-2016/प्र.क्र.16/2016/राकावि-2,दि. 16.03.2016

**विषय:- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ देणे बाबत.**

राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी स्वरुपात कार्यरत असलेले अधिकारी/ कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू असल्याने या अधिकारी/कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबीयांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल), नियम 1961 मधील तरतुदीच्या अधिन राहून आकस्मीक उदभवणा-या 13 आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील तसेच 05 गंभीर आजारावर शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी आकस्मीक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती व प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीबाबत संदर्भ क्र.1 ते 3 च्या शासन निर्णयात नमुद असल्याप्रमाणे सदर योजना महानगरपालिकेतील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना **दिनांक 01.04.2018 पासून लागू करावयाची आहे.**

मनपा अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी शासकीय रुग्णालयातून अथवा संपूर्णपणे शासनाच्या नियंत्रणाखाली असणारे शासकीय रुग्णालय किंवा दवाखाना किंवा प्रसुतीगृह किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा वैद्यक व्यवसायीचे अर्थसहायीत केंद्र आणि राज्य मदत देत असलेले कोणतेही रुग्णालय किंवा दवाखाना किंवा प्रसुतीगृह यांचा समावेश होतो. तसेच महानगरपालिका कर्मचा-यांने नांदेड महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या हॉस्पीटल व दवाखाने मधून उपलब्ध होणारे उपचार (उदा.प्रसुती, एक्सरे, सोनग्राफी, लॅबोरेटरी टेस्ट, टी.बी सेंटर वगैरे) येथूनच घेणे बंधनकारक राहील. जे उपचार मनपा हॉस्पीटल व दवाखान्यातून उपलब्ध होणार नाही अशा वेळी खाजगी रुग्णालयातून उपचार घेणे उचित होईल.

➢ **औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपुर्ती**

वेतनगटानुसार औषधोपचारावरील खर्चाच्या प्रतिपुर्तीची अनुज्ञेय रक्कम संदर्भ क्र.06 च्या शासन निर्णयातील तक्ता `अ` मध्ये नमुद केले आहे. त्यानुसार वेतनश्रेणीचे वर्गीकरण न करता औषधोपचारावरील खर्च खालील तक्ता `ब` नुसार अनुज्ञेय राहील.

तक्ता `ब`

| अ.क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती करावयाचा सुधारित दर |
|---|---|---|
| 1 | जनरल वार्ड (सर्वसामान्य कक्ष) | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 95 % अनुज्ञेय |
| 2 | जनरल वार्ड (सर्वसामान्य कक्ष) बाजूचा बाथरुम नसलेला कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 90 % अनुज्ञेय |

| | | |
|---|---|---|
| 3 | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 75 % अनुज्ञेय |
| 4 | बाथरुमसह डबल बेडेड कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 75 % अनुज्ञेय |
| 5 | बाथरुमसह वातानुकुलित कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 75 % अनुज्ञेय |
| 6 | अतिदक्षता कक्ष (आय.सी.यु.) | 100 % |

विशेष टिप:- वरील तक्ता ब मधील अनुक्रमांक 5 येथे नमुद केलेला बाथरुमसह वातानुकुलित कक्ष हा केवळ जे अधिकारी विमान प्रवासासाठी पात्र आहेत, त्यांना अनुज्ञेय राहील.

उपरोक्त शासन निणर्यातील तक्ता ब नुसार मनपा कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती शासनानी वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/आदेशातील सुधारित दरानुसार लागू राहतील.

- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-2016/प्र.क्र.16/ 2016/राकावि-2, दि. 16 मार्च, 2016 अन्वये महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहुन रुपये 3,00,000/- (अक्षरी-रुपये तीन लाख फक्त ) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबधित विभाग प्रमुख म्हणजेच आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राहतील.
- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.एएमजी-2005/9/प्र.क्र.1/2016/आरोग्य-3, दि. 19 मार्च, 2005 अन्वये विहीत तरतुदीत न बसणा-या कांही अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मान्यता द्यावयाची असल्यास अशाप्रकरणी निर्णय घेण्यासाठी महानगरपालिका स्तरावर प्रकरणे तपासणेकामी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

1. आयुक्त मनपा,नांदेड किंवा आयुक्तांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त- अध्यक्ष
2. उप आयुक्त (प्रशासन),मनपा,नांदेड- सदस्य
3. मुख्य लेखापरिक्षक,मनपा,नांदेड- सदस्य
4. मुख्य लेखाधिकारी,मनपा,नांदेड- सदस्य
5. वैद्यकीय आरोग्य अधिकारी,मनपा,नांदेड- सदस्य
6. विधी अधिकारी,मनपा,नांदेड- सदस्य

सदरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांनाच लागू करावयाची असल्याने कुंटूंब याची व्याख्या करणे आवश्यक आहे. कुटूंबाची व्याख्या खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

- **कुटुंब म्हणजे:-**

7. अधिकारी/कर्मचा-यांची पत्नी किंवा पती
8. शासकीय कर्मचा-यांवर अवलंबून असतील अशी शासकीय कर्मचा-यांची औरस मुले,सावत्र मुले, कायदेशिर दत्तक घेतलेली मुले
9. शासकीय कर्मचा-यांवर पूर्णपणे अवलंबून असलेले शासकीय कर्मचा-यांचे आई-वडील (महीला शासकीय कर्मचा-याला तिच्या पुर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्या बरोबर राहत असलेल्या तिच्या आई-वडिलांची किंवा सासू-सास-याची निवड करता येईल)
10. शासकीय कर्मचा-यांवर पुर्णपणे अवलंबून असलेल्या 18 वर्षापेक्षा कमी वय असलेले अविवाहीत भाऊ व बहिण
11. महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 28.03.2005 पुर्वीच्या कर्मचा-यांच्या तीन मुलापर्यंत व दि.28.03.2005 नंतरच्या दोन मुलांना वैद्यकीय प्रतिपुर्ती लागू राहील.

महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.एएमजी-2005/9/ प्र.क्र.1/2016/आरोग्य-3, दि.19 मार्च, 2005 मधील परिशिष्ट- अ मध्ये नमुद शासन विर्निदिष्ट 13 आकस्मिक आजार व 5 गंभीर आजारांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| 13 आकस्मिक आजारांची यादी | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र** | आकस्मिक आजाराचे नांव | **अ.क्र** | आकस्मिक आजाराचे नांव |
| 1 | हृदयविकाराचा झटका (Cardiac emergency) प्रमस्तिक संह्नी (Cerabral vascular) फुफुसाच्या विकाराचा झटका (Pulmonary emergency )/ अन्जिओग्राफी चाचणी | 8 | ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती (Congenital Anamolies requiring urgent surgical intervention ) |
| 2 | अपघात (Accident) आघात संलक्षण (Cerabral Vascular) हृदयाशी आणि रक्तवाह्निनीशी संबधित (Cardiological and Vascular) | 9 | ब्रेन टयुमर ( Brain Tumour ) |
| 3 | जोरदार रक्तस्त्राव (Severe haemorrhage) | 10 | भाजणे ( Burns ) |
| 4 | निश्चतेनावस्था ( Coma ) | 11 | अक्यूट ग्लॅकोमा ( Acute Glaucoma) |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | डोळयातील दृष्टीपटल सरकणे ( Retinal detachment in the eye ) | 12 | स्पायपनस स्कॉड (मज्जारज्जू) संबधात आकस्मिक आजार |
| 6 | जननमुत्र आकस्मिक आजार (Genito-urinary emergency ) | 13 | रसायनामुळे होणारी विषबाधा |
| 7 | वायु कोथ (Gas Gangrine ) | | |

| 05 गंभीर आजारांची यादी | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र** | **गंभीर आजारांचे नांव** | **अ.क्र** | **गंभीर आजारांचे नांव** |
| 1 | हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे (Heart Surgery) | 4 | मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ( Kidney Transplantation ) |
| 2 | हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye pass Surgery) | 5 | रक्ताचा कर्करोग (Blood Cancer) कॅन्सर (इतर) |
| 3 | अन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया | | |

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2,दि.16 नोव्हेंबर, 2011 अन्वये मधील परिशिष्ट- अ मध्ये दर्शविल्यानुसार शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट उपचाराच्या खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुगणालयाची अद्यावत यादीप्रमाणेच वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ अज्ञुनेय राहील.

तसेच तपासणी सुची व आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या औषधोपचारांच्या खर्चाची प्रतिपुर्तीची मागणी सादर करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीचा प्रस्ताव तपासून संबधित विभाग प्रमुखांने सादर करणे आवश्यक आहे.**( सोबत तपासणी सुची व मार्गदर्शक सुचना जोडण्यात आली आहे.)**

उक्त नमुद केल्याप्रमाणे विभागप्रमुख स्तरावर प्रकरणांना मंजुरी देतांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम,1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी काटेकोरपणे तपासून वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची मंजुरी देण्यात येईल. तसेच शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रकातील नियम व अटी लागू राहतील.

**नांदेड महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ दिनांक 01.04.2018 पासून लागू राहील.** सदरचा कार्यालयीन प्रस्ताव धोरणात्मक स्वरुपाचा असल्यामुळे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभे समोर प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव.

**महेश कनकदंडे** वैदयकीय प्रतिपुर्तीचा विषय हा अत्यंत चांगला विषय घेतला आहे. त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने करण्यात यावी यात कोणतीही त्रुटी राहता कामा नये. सर्व रोगाचा समावेश करण्यात यावा. सेवा नियम आहेत त्याचा विचार करावा.

**आयुक्त** वैदयकीय प्रतिपुर्तीचा विषय हा घेतला आहे. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार या वैदयकीय प्रतिपुर्तीचा विषय घेतला तर साधे साधे आजाराचा त्यात समावेश आहे परंतू आपण काही निवडक आजाराचा फायदा यात समावेश केला आहे. शासन निर्णयानुसार आपण भेदभाव केला आहे. कारण लहान लहान आजारावर बोगस बिल सादर करुन बिल उचलण्यात येतात असा अनुभव शासनास्तरावर आलेला आहे. या ठिकाणी तसे होताणा आपणास दिसणार नाही, याची काळजी घेण्यात आलेली आहे.

**दिपकसिंग रावत** हा प्रस्ताव एकमताने पास करण्यात यावा.

**आनंद चव्हाण** वैदयकीय प्रतिपुर्तीचा विषय हा चांगला विषय आपण घेतला आहे. याबाबत आपण एक समिती गठीत करावी. जेणे करुन याचा काही दुरुपयोग होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

**सभागृह नेता** शासन वैदयकीय प्रतिपुर्तीचा विचार न देण्याचा करीत आहे. आपण देत आहो हे योग्य आहे. आम्ही म्हणतो दर वर्षी जास्तीचा खर्च होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी, आम्ही म्हणतो की प्रतीवर्षी जास्तीत जास्त 50 लक्षापेक्षा जास्त खर्च होणार नाही या कडे लक्ष दिले पाहीजे व हा विषय पास करण्यात यावा.

**महेश कनकदंडे** वैदयकीय प्रतिपुर्ती करीत असतांना सिव्हील सर्जनची स्वाक्षरीची आवश्यकतेची अट घालण्यात आली आहे ती शिथील करण्यात यावी कारण आपल्याकडे वैदयकीय आरोग्य अधिकारी आहे त्याकरीता कर्मचा-यास त्यांचेकडे पाठविण्यात येवू नये.

**महापौर** प्रशासनाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ आर्थीक वर्षात 50.00 लक्ष पर्यत खर्च करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**ठराव क्रं.20** **ठराव**

**वाचा:-**1. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी 1091/3456/प्र.क्र.320/91/आ-7,दि.14.01.1993

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-1099/प्र.क्र.40/आ- 3 ,दि. 29.07.1999
3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-1099/प्र.क्र.40/आ-3,दि. 25.02.2000
4. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-1095/प्र.क्र.45/95/आ-3,दि. 04.04.2000
5. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-1099/1333/प्र.क्र.201/आ-3,दि. 29.11.2004
6. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.एमएजी-2005/9/प्र.क्र.1/आ-3,दि. 19.03.2005
7. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2,दि. 16.11.2011
8. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र. वैखप्र-2016/प्र.क्र.16/2016/राकावि-2,दि. 16.03.2016

**विषय:- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ देणे बाबत.**

राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी स्वरुपात कार्यरत असलेले अधिकारी/ कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू असल्याने या अधिकारी/कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबीयांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल), नियम 1961 मधील तरतुदीच्या अधिन राहून आकस्मीक उदभवणा-या 13 आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील तसेच 05 गंभीर आजारावर शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी आकस्मीक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती व प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीबाबत संदर्भ क्र.1 ते 3 च्या शासन निर्णयात नमुद असल्याप्रमाणे सदर योजना महानगरपालिकेतील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना **दिनांक 01.04.2018 पासून लागू करावयाची आहे.**

मनपा अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी शासकीय रुग्णालयातून अथवा संपूर्णपणे शासनाच्या नियंत्रणाखाली असणारे शासकीय रुग्णालय किंवा दवाखाना किंवा प्रसुत्तीगृह किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा वैद्यक व्यवसायीचे अर्थसहायीत केंद्र आणि राज्य मदत देत असलेले कोणतेही रुग्णालय किंवा दवाखाना किंवा प्रसुत्तीगृह यांचा समावेश होतो. तसेच महानगरपालिका कर्मचा-यांने नांदेड महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या हॉस्पीटल व दवाखाने मधून उपलब्ध होणारे उपचार (उदा.प्रसुती, एक्सरे, सोनग्राफी, लॅबोरेटरी टेस्ट, टी.बी सेंटर वगैरे) येथूनच घेणे बंधनकारक राहील. जे उपचार मनपा हॉस्पीटल व दवाखान्यातून उपलब्ध होणार नाही अशा वेळी खाजगी रुग्णालयातून उपचार घेणे उचित होईल.

➢ **औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपुर्ती**

वेतनगटानुसार औषधोपचारावरील खर्चाच्या प्रतिपुर्तीची अनुज्ञेय रक्कम संदर्भ क्र.06 च्या शासन निर्णयातील तक्ता `अ` मध्ये नमुद केले आहे. त्यानुसार वेतनश्रेणीचे वर्गीकरण न करता औषधोपचारावरील खर्च खालील तक्ता `ब` नुसार अनुज्ञेय राहील.

तक्ता `ब`

| अ.क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती करावयाचा सुधारित दर |
|---|---|---|
| 1 | जनरल वार्ड (सर्वसामान्य कक्ष) | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 95 % अनुज्ञेय |
| 2 | जनरल वार्ड (सर्वसामान्य कक्ष) बाजूचा बाथरुम नसलेला कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 90 % अनुज्ञेय |
| 3 | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 75 % अनुज्ञेय |
| 4 | बाथरुमसह डबल बेडेड कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 75 % अनुज्ञेय |
| 5 | बाथरुमसह वातानुकुलित कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट 75 % अनुज्ञेय |
| 6 | अतिदक्षता कक्ष (आय.सी.यु.) | 100 % |

विशेष टिप:- वरील तक्ता ब मधील अनुक्रमांक 5 येथे नमुद केलेला बाथरुमसह वातानुकुलित कक्ष हा केवळ जे अधिकारी विमान प्रवासासाठी पात्र आहेत, त्यांना अनुज्ञेय राहील.

उपरोक्त शासन निर्णयातील तक्ता ब नुसार मनपा कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती शासनानी वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/आदेशातील सुधारित दरानुसार लागू राहतील.

- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-2016/प्र.क्र.16/ 2016/राकावि-2, दि. 16 मार्च, 2016 अन्वये महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहुन रुपये 3,00,000/- (अक्षरी-रुपये तीन लाख फक्त ) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबधित विभाग प्रमुख म्हणजेच आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राहतील.
- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.एएमजी-2005/9/प्र.क्र.1/2016/आरोग्य-3, दि. 19 मार्च, 2005 अन्वये विहीत तरतुदीत न बसणा-या कांही अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मान्यता द्यावयाची असल्यास अशाप्रकरणी निर्णय घेण्यासाठी महानगरपालिका स्तरावर प्रकरणे तपासणेकामी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

12. आयुक्त मनपा,नांदेड किंवा आयुक्तांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त- अध्यक्ष
13. उप आयुक्त (प्रशासन),मनपा,नांदेड- सदस्य
14. मुख्य लेखापरिक्षक,मनपा,नांदेड- सदस्य
15. मुख्य लेखाधिकारी,मनपा,नांदेड- सदस्य
16. वैद्यकीय आरोग्य अधिकारी,मनपा,नांदेड- सदस्य
17. विधी अधिकारी,मनपा,नांदेड- सदस्य

सदरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांनाच लागू करावयाची असल्याने कुंटूंब याची व्याख्या करणे आवश्यक आहे. कुटूंबाची व्याख्या खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

- **कुटुंब म्हणजे:-**

18. अधिकारी/कर्मचा-यांची पत्नी किंवा पती
19. शासकीय कर्मचा-यांवर अवलंबून असतील अशी शासकीय कर्मचा-यांची औरस मुले,सावत्र मुले, कायदेशिर दत्तक घेतलेली मुले
20. शासकीय कर्मचा-यांवर पूर्णपणे अवलंबून असलेले शासकीय कर्मचा-यांचे आई-वडील (महीला शासकीय कर्मचा-याला तिच्या पुर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्या बरोबर राहत असलेल्या तिच्या आई-वडिलांची किंवा सासू-सास-याची निवड करता येईल)
21. शासकीय कर्मचा-यांवर पुर्णपणे अवलंबून असलेल्या 18 वर्षापेक्षा कमी वय असलेले अविवाहीत भाऊ व बहिण
22. महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 28.03.2005 पुर्वीच्या कर्मचा-यांच्या तीन मुलापर्यंत व दि.28.03.2005 नंतरच्या दोन मुलांना वैद्यकीय प्रतिपुर्ती लागू राहील.

महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.एएमजी-2005/9/ प्र.क्र.1/2016/आरोग्य-3, दि.19 मार्च, 2005 मधील परिशिष्ट- अ मध्ये नमुद शासन विर्निदिष्ट 13 आकस्मिक आजार व 5 गंभीर आजारांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| **13 आकस्मिक आजारांची यादी** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र** | आकस्मिक आजाराचे नांव | **अ.क्र** | आकस्मिक आजाराचे नांव |
| 1 | हृदयविकाराचा झटका (Cardiac emergency) प्रमस्तिक संहनी (Cerabral vascular) फुफुसाच्या विकाराचा झटका (Pulmonary emergency )/ अन्जिओग्राफी चाचणी | 8 | ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती (Congenital Anamolies requiring urgent surgical intervention ) |
| 2 | अपघात (Accident) आघात संलक्षण (Cerabral Vascular) हृदयाशी आणि रक्तवाहिनीशी संबधित (Cardiological and Vascular) | 9 | ब्रेन टयुमर ( Brain Tumour ) |
| 3 | जोरदार रक्तस्त्राव (Severe haemorrhage) | 10 | भाजणे ( Burns ) |
| 4 | निश्चतेनावस्था ( Coma ) | 11 | अक्यूट ग्लॅकोमा ( Acute Glaucoma) |
| 5 | डोळयातील दृष्टीपटल सरकणे ( Retinal detachment in the eye ) | 12 | स्पायपनस स्कॉड (मज्जारज्जू) संबधात आकस्मिक आजार |
| 6 | जननमुत्र आकस्मिक आजार (Genito-urinary emergency ) | 13 | रसायनामुळे होणारी विषबाधा |
| 7 | वायु कोथ (Gas Gangrine ) | | |

| 05 गंभीर आजारांची यादी | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | गंभीर आजारांचे नांव | अ.क्र | गंभीर आजारांचे नांव |
| 1 | हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे (Heart Surgery) | 4 | मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ( Kidney Transplantation ) |
| 2 | हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye pass Surgery) | 5 | रक्ताचा कर्करोग (Blood Cancer) कॅन्सर (इतर) |
| 3 | अन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया | | |

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2,दि.16 नोव्हेंबर, 2011 अन्वये मधील परिशिष्ट- अ मध्ये दर्शविल्यानुसार शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट उपचाराच्या खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुगणालयाची अद्यावत यादीप्रमाणेच वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ अनुज्ञेय राहील.

तसेच तपासणी सुची व आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या औषधोपचारांच्या खर्चाची प्रतिपुर्तीची मागणी सादर करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीचा प्रस्ताव तपासून संबधित विभाग प्रमुखांने सादर करणे आवश्यक आहे.**( सोबत तपासणी सुची व मार्गदर्शक सुचना जोडण्यात आली आहे.)**

उक्त नमुद केल्याप्रमाणे विभागप्रमुख स्तरावर प्रकरणांना मंजुरी देतांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम,1961 व त्यानंतर  वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी काटेकोरपणे तपासून वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची मंजुरी देण्यात येईल. तसेच शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रकातील नियम व अटी लागू राहतील.

**नांदेड महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचा लाभ दिनांक 01.04.2018 पासून लागू करण्यास तसेच दर आर्थीक वर्षात 50.00 लक्षा पर्यंतच्या खर्च करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

<u>स. सदस्यांचे प्रस्ताव/सुचना</u>

**विषय क्रं.20** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालकीची श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयम व परिसरातील जिल्हा क्रिडा कार्यालयाची इमारती महानगरपालिकेचा ताब्यात घेणे बाबत.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक**:- उमेश पवळे

**सभागृह नेता** जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे कार्यालयाकडे वेळोवेळी शासनाकडून अनुदान प्राप्त होत होते त्यासाठी त्यांच्याकडे जागा नव्हती. जागा नाही आणि निधी तर खर्च करणे आवश्यक होते अशा वेळी मनपाने त्यांना जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी ते केलेले बांधकाम महापालिकेस हस्तांतर करावे असे होते. होस्टेलच्या मागची जागा त्यांनी वापरण्यास सुरुवात केली, त्यांनी वाणिज्य वापर करीत असल्याचे दिसुन येत आहे. स्टेडीयमच्या मागचे जागेत त्यांनी कार्यालये थाटली आहेत. जागा देण्याचे अधिकार हे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस आहेत अशी जागा जिल्हा क्रिडा कार्यालयास दिलेली नाही.आजही सर्व मालकी मनपाची आहे. येत्या कालावधीमध्ये स्टेडीयम भव्य दिव्ये होणार आहे, याकरीता राष्ट्रीय नामांकानुसार स्टेडीयम हे सुरक्षेच्या दृष्टीने आपल्या ताब्यात असणे आवश्यक  आहे. या परीसरातील सर्व इमारती मनपाच्या ताब्यात घेण्याची आवश्यकती सर्व कार्यवाही  तात्काळ आयुक्तांनी करावी अशी त्यांना विनंती आहे.

**किशोर स्वामी** मा. अशोकरावजी चव्हाण साहेबांच्या प्रयत्नाने केंद्र शासनाकडून स्टेडीयमचा विकास करण्यासाठी 42 कोटीचा निधी उपलब्ध करुन घेतला आहे. त्यासाठी सदरची इमारती या त्वरीत मनपाच्या ताब्यात घेण्यात याव्यात.

**दुष्यंत सोनाळे** रुचीरा हॉटेलच्या मागची जागेत खुप घाण झालेली आहे त्यासाठी रुचीरा हॉटलला त्या ठिकाणावरुन त्वरीत हटविण्यात यावे. पुर्ण ड्रेनेज त्यांनी चोकप केले आहे. त्यास हटवावे अशी विनंती आहे.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.21** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालकीची श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयम व परिसरातील जिल्हा क्रिडा कार्यालयाची इमारती महानगरपालिकेचा ताब्यात घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.  नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.21** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत हबीबीया कॉलनी येथे मनपाकेची प्राथमिक शाळा चालविण्यात येते सदरील शाळेत इयत्ता ०१ ते ०८ वर्गा पर्यंत विद्यार्थांना शिक्षण देण्यात येते. सदरील इमारती ही खाजगी असुन एका-एका खोलीत दोन वर्ग चालतात जागा अपुरी पडत असल्याने सदरची शाळा ईदगाहच्या मागे बिएसयुपी योजने अंतर्गत एक इमारत बांधण्यात आलेली असुन सदरील इमारतीत सदरची शाळा स्थलांतरीत करण्यास सर्वसाधारण सभे मान्यता घेण्यात यावी.

**सुचक** :- अरशीया कौसर मोहम्मद हबीब **अनुमोदक** :- शमीम बेगम शेख जावीद

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

नावाशमनपा नांदेडच्या वतीने चालविण्यात येणारी मनपा प्रा.शा. महेबुबीया कॉलनी येथे इयत्ता पहिली ते आठवी वर्ग चालविण्यात येत असुन सदर शाळेत 08 वर्ग खोल्या व कार्यालयासाठी एक खोली अशा एकूण नऊ खोल्या उपलब्ध आहेत. तसेच सदर शाळा ही दोन सत्रात चालविण्यात येते. प्रस्तावात नतुद केलेल्या ठिकाणी जागा ही सदर शाळेपासुन 01 कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असल्यामुळे विद्यार्थ्यांना जाण्या येण्यासाठी दुर पडेल. तसेच शाळेत येण्या जाण्यासाठी विद्यार्थ्यांना रहदारी असलेला रोड पार करावा लागत असून इयत्ता पहिली ते चौथी वर्गातील विद्यार्थी हे वयाने लहान असल्यामुळे सदरील रोड पार करणे हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोणातुन अत्यंत धोकादायक असून सदर भागात अधीपासून खाजगी संस्थांच्या अन्य शाळा कार्यरत असल्यामळे तेथे विद्यार्थी संख्या मिळण्यास अवघड जाईल व जुन्या विद्यार्थ्यांना येण्या जाण्यास दुर पडत असल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही असा अहवाल सदर शाळेच्या मुख्याध्यापकांनी सादर केलेला असून त्यानुसार सदर शाळेचे स्थलांतर करणे योग्य होणार नाही.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.22** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत हबीबीया कॉलनी येथे मनपाकेची प्राथमिक शाळा चालविण्यात येते सदरील शाळेत इयत्ता ०१ ते ०८ वर्गा पर्यंत विद्यार्थांना शिक्षण देण्यात येते. सदरील इमारती ही खाजगी असुन एका-एका खोलीत दोन वर्ग चालतात जागा अपुरी पडत असल्याने सदरची शाळा ईदगाहच्या मागे बिएसयुपी योजने अंतर्गत एक इमारत बांधण्यात आलेली असुन सदरील इमारतीत सदरची शाळा स्थलांतरीत करण्यासाठीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

तथापि प्रस्तावात नतुद केलेल्या ठिकाणी जागा ही सदर शाळेपासुन 01 कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असल्यामुळे विद्यार्थ्यांना जाण्या येण्यासाठी दुर पडेल. तसेच शाळेत येण्या जाण्यासाठी विद्यार्थ्यांना रहदारी असलेला रोड पार करावा लागत असून इयत्ता पहिली ते चौथी वर्गातील विद्यार्थी हे वयाने लहान असल्यामुळे सदरील रोड पार करणे हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोणातुन अत्यंत धोकादायक असून सदर भागात अधीपासून खाजगी संस्थांच्या अन्य शाळा कार्यरत असल्यामुळे तेथे विद्यार्थी संख्या मिळण्यास अवघड जाईल व जुन्या विद्यार्थ्यांना येण्या जाण्यास दुर पडत असल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे सदरची शाळेचे स्थलांतर करणे शक्य होणार नसल्याचे प्रशासनाचे म्हणण्यानुसार सदरची शाळा स्थलांतर न करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.22** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. 12 मधील बिएसयुपी योजने अंतर्गत पाकीजानगर येथे कम्युनिटी हॉल बांधण्यात आले आहे. परंतु ज्या उद्देशासाठी कम्युनिटी हॉल बांधण्यात आले आहे, ते उद्देश पुर्ण झाले नाही. कम्युनिटी हॉलचा वापर अद्याप करण्यात आला नाही याचे कारण काय ? याचे स्पष्टीकरण सर्वसाधारण सभेपुढे सादरा करणे बाबत.

**सुचक**:- अ. सत्तार अ. गफुर **अनुमोदक**:- अब्दुल रशीद अ.गणी, शमीम बेगम शेख जावीद

**अब्दुल सत्तार** आपली जी प्रभाग क्रमांक 12 मध्ये उर्दु शाळा आहे ती उर्दू शाळा स्थलांतरीत करावी. आपण खर्च करुन तयार केलेली मालमता आहे तीचा वापर शाळे सुरु करण्यासाठी करावा अशी आमची विनंती सभागृहास आहे.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते पाकीजा नगर येथील बिएसयुनी योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या कम्युनिटी हॉलचे दुरुस्ती करुन सदरचा हॉल लहान कार्यक्रमासासठी भाडेतत्वावर देण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.23** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. 12 मधील बिएसयुपी योजने अंतर्गत पाकीजानगर येथे कम्युनिटी हॉल बांधण्यात आले आहे. परंतु ज्या उद्देशासाठी कम्युनिटी हॉल बांधण्यात आले आहे, ते उद्देश पुर्ण झाले नाही. सदरचा कम्युनिटी हॉल हे नादुरुस्त असल्याने त्यास तात्काळ दुरुस्ती करुन सदरचे हॉल हे कार्यक्रमासाठी भाडेवर देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.23** **प्रस्ताव**

भुतपुर्व नांदेड नगरपालिकेत सालसन 1976 पर्यंत मयत कोंडया राध्या जोंधळे हे मजुर पदावर सफाई विभागात कामावर होते. सेवेत असतांना ते मृत्यु पावले आहेत. परंतु महानगरपालिका प्रशासनाने दिनांक 21.04.2008 रोजी त्यांच्या सेवे बद्दलचे कोणतेही अभिलेखे उपलब्ध नसल्याने त्यांच्या वारसास नियुक्ती देण्याबाबत नकार दिला आहे.

कर्मचा-यांचे सेवेचे अभिलेखे जतन ठेवण्याची जबाबदारी ही प्रशासनाची असल्यामुळे या प्रकरणी पुन्हा एकदा मयत कोंडया राध्या जोंधळे यांच्या सेवा केल्या बाबतचे प्रशासनाकडून पडताळणी करण्यात यावी त्यानुसार त्यांचे वारस राजु गणेश जोंधळे याला लाड कमिटीच्या शिफारशीनुसार मजुर पदावर नियमानुसार नेमणुक देण्याची कार्यवाही करण्याची ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते.

**सुचक:-** अ. फहीम अ. मुनीर **अनुमोदक:-** शोएब हुसेन

**<u>प्रशासकिय अहवाल</u>**

भुतपुर्व नांदेड नगरपालिका अस्तित्वात असतांना सेवेत असतांना कोंडया राध्या जोंधळे शिपायी हे दिनांक 21.04.1988 रोजी मृत पावले आहेत. संबंधीतांच्या वारसांनी सालसन 2004 म्हणजेच 16 वर्षानंतर त्यांचे नातु राजु गणेश जोंधळे यांनी अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणे बाबत अर्ज सादर केला आहे.

अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणे बाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक अकंपा/184/189/सीआर-155/तेरा-अ/दिनांक 08 मार्च 1985 च्या शासन निर्णयात मृत कर्मचा-यांच्या पाच वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेसाठी अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. संबंधीतांनी 16 वर्षानंतर त्यांचे वारस नातु यांनी दिलेला अर्ज शासन निर्णयातील तरतुदीशी विसंगत स्वरुपाचा आहे त्यामुळे त्यांचा अर्ज अमान्य करण्यात आलेला आहे.

या प्रकरणात संबंधीतांनी औद्योगिक न्यायालय जालना येथे ULP क्रमांक 29/2011 दाखल केलेला अर्ज औद्योगिक न्यायालयाने दिनांक 10.09.2012 रोजी अमान्य केला आहे.

तसेच याप्रकरणात यापुर्वी महासभेने दिनांक 30.12.2012 रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक 142 हा शासन निर्णयातील तरतुदीशी विसंगत स्वरुपाचा असल्याने सदरचा ठराव विखंडीत करण्यासाठी कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-2/539/11 दिनांक 02.05.2011 अन्वये शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक सफाई-2014/प्र.क्र.07/महामंडळे मंत्रालय मुंबई दिनांक 26 फेब्रुवारी 2014 नुसार सफाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त विकलांग झाल्याच्या दिनांका पासुन 01 वर्षाची राहिल असे नमुद आहे.

उपरोक्त सर्व बाब विचारात घेता श्री राजु गणेश जोंधळे यास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देता येणार नाही.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.24** **ठराव**

भुतपुर्व नांदेड नगरपालिकेत सालसन 1976 पर्यंत मयत कोंडया राध्या जोंधळे हे मजुर पदावर सफाई विभागात कामावर होते. सेवेत असतांना ते मृत्यु पावले आहेत. परंतु महानगरपालिका प्रशासनाने दिनांक 21.04.2008 रोजी त्यांच्या सेवे बद्दलचे कोणतेही अभिलेखे उपलब्ध नसल्याने त्यांच्या वारसास नियुक्ती देण्याबाबत नकार दिला आहे.

कर्मचा-यांचे सेवेचे अभिलेखे जतन ठेवण्याची जबाबदारी ही प्रशासनाची असल्यामुळे या प्रकरणी पुन्हा एकदा मयत कोंडया राध्या जोंधळे यांच्या सेवा केल्या बाबतचे प्रशासनाकडून पडताळणी करण्यात यावी त्यानुसार त्यांचे वारस राजु गणेश जोंधळे याला लाड कमिटीच्या शिफारशीनुसार मजुर पदावर नियमानुसार नेमणुक देण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.24** **प्रस्ताव**

राष्ट्रवीर वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांची जयंती दिनांक 16.06.2018 रोजी असुन सदरील महानगरपालिके तर्फे महापुरुषांज्या जयंती साजरा करण्यात यावी व त्या निमित्त राष्ट्रीवर वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांच्या जिवनावर आधारीत दर वर्षी कार्यक्रम घेण्यात यावी.

**सुचक** :- भानुसिंह गयादिनसिंह रावत, अमितसिंह तेहरा **अनुमोदक** :- खालसा प्रकाशकौर सुरजीतसिंघ, उमेश चव्हाण

**भानुसिंह रावत** राष्ट्रवीर वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांच्या जयंती निमित्त दर वर्षी त्यांच्या जिवनावर सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात यावा सदरच्या कार्यक्रमावर होणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात यावी

**महापौर** श्री भानुसिंह रावत यांनी मांडलेल्या दुरुस्ती प्रस्तावासह मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.25** **ठराव**

राष्ट्रवीर वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांची जयंती दिनांक 16.06.2018 रोजी असुन सदरील महानगरपालिके तर्फे महापुरुषांज्या जयंती साजरा करण्यात यावी व त्या निमित्त राष्ट्रीवर वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांच्या जिवनावर आधारीत दर वर्षी सांस्कतीक कार्यक्रम घेण्यात यावा सदरच्या कार्यक्रमावर होणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.25** **प्रस्ताव**

राष्ट्रवीर वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांची पुण्यतिथी दरवर्षी दिनांक 19 जानेवारी रोजी येते. सदरील वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांची पुण्यतिथी दरवर्षी 19 जानेवारीला प्रशासनातर्फे दिप प्रज्वलीत करुन व कार्यक्रम होऊन अभिवादन करण्यासाठी व तसेच वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांच्या पुण्यातिथी निमीत्त राष्ट्रप्रेरीत गिताचा व महाराणा प्रतापजी यांची शोर्यगाथा इत्यादी कार्यक्रम घेण्यासाठी ही सर्वसाधारण सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**सुचक**:- दिपकसिंह काशिनाथसिंह रावत **अनुमोदक**:- सौ.गुरूप्रितकौर दिलीपसिंघ सोडी

**दिपकसिंग रावत** पुण्यतिथी सुध्दा साजरी करण्यात यावी, इतर महापुरुषाच्या पुण्यतिथी साजरी करण्यात येत त्याच धर्तीवर ही सुध्दा पुण्यतिथी साजरी करावी.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.26** **ठराव**

राष्ट्रवीर वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांची पुण्यतिथी दरवर्षी दिनांक 19 जानेवारी रोजी येते. सदरील वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांची पुण्यतिथी दरवर्षी 19 जानेवारीला प्रशासनातर्फे दिप प्रज्वलीत करुन व कार्यक्रम होऊन अभिवादन करण्यासाठी व तसेच वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांच्या पुण्यातिथी निमीत्त राष्ट्रप्रेरीत गिताचा व महाराणा प्रतापजी यांची शोर्यगाथा इत्यादी कार्यक्रम घेण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.26** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे व महापालिका मालकीच्या जागेचे भाडेकरुंच्या नाव परिवर्तन करणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये कुठेही तरतुद नसल्यामुळे जे भाडेकरु भागीदारीत व्यवसाय करतात व भागीदारी संपुष्टात आल्यानंतर सदरील दुकान भागीदारीच्या वाटयाला आल्यास त्यांचे नांव भाडेपट्टीचे नांव परिवर्तन होत नाही या भाडेकरुंच्या अडचणी असल्यामुळे यापुर्वी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ठराव पारीत करुन अभय योजना राबविली ज्यामुळे भाडेकरुंचे नांव परिवर्तन करण्यात आले व महापालिकेला आर्थीक उत्पन्न मिळाले.

तरी अभय योजना काढून मनपाकेचे भागीदारी वरिल भाडेकरुंचे रु. 1.00 लक्ष व वारसासाठी रु. 20,000/- शुल्क घेवुन भाडेपट्टीचे नांव परिवर्तन करण्याचा ठराव पारीत करण्यात येतो व हा ठराव याच सभेमध्ये कायम करण्यात येतो.

**सुचक** :- अब्दुल हफीज अब्दुल करीम **अनुमोदक**:- अ. लतीफ अ. मजीद

**महेश कनकदंडे** मनपाचे गाळे हे अत्यंत चांगले आर्थिक उत्पन वाढ करण्यासारखे आहेत. एखादा गाळे धारक दुस-या व्यापा-यास ते लिजवर देतो हा व्यवहार दोन्हीही व्यक्ती परस्पर करीत असतात आताच्या बाजार भावा प्रमाणे आपणास नाममात्र रक्कम मिळत असते. याचा विचार केल्यास आपले उत्पनात घट होत आहे. आता त्या दुकानाचा लिलाव करावा असे मला वाटते. आरआर पेक्षा 50 टक्के जास्त ठेवण्यात यावे.

**मालमत्ता व्यवस्थापक** आरआर नुसार आपण गाळयाची वसुली करीत आहोत परंतू आतापर्यत केवळ 40 टक्केच वसुली होत आहे. बाकीची वसुली आतापर्यत होण्यास अडचणी येत आहेत. यात अभय योजना सुरु करण्यात यावी अशी सभागृहास विनंती आहे.

**सभागृह नेता** अभय योजनेचा कालावधी निर्धारीत करण्यात यावा. जास्त कालावधी ठेवण्यात येवू नये जास्तीत जास्त तीन महीण्याचा कालावधी असला पाहीजे.

**सतिश देशमुख** जिल्हा परिषदेच्या बाजूच्या गाळेमध्ये दुस-यांदा त्यास मॉर्डगेज करावयाचे आहे त्यास करुन देण्याकरीता आपली एनओसी आवश्यक असल्याचे सांगाण्यात येत आहे आपण तात्काळ एनओसी देण्यात यावी.

**मालमत्ता व्यवस्थापक** सन्मानच्या मालकास आपण एनओसी दिलेली आहे आणि आता वेगळयाने आपणास एनओसी देण्याची तरतूद नाही त्यामुळे स्वतंत्र गाळे धारकास एनओसी देता येत नाही. दिलेली एनओसीस ग्राहय धरण्यात यावी.

**महेश कनकदंडे** एनओसी देण्यास आपणास काही हरकत नाही.

**उप आयुक्त (विकास)** आता जो प्रश्न देशमुख साहेबांनी विचारला आहे त्याचा खुलासा मी या ठिकाणी करतो. संबधीताने दुकान घेतले आहे. त्याला आता व्यवसाय करावयाचा आहे व्यवसाय करण्यासाठी त्यास निधी उपलब्ध करुन घ्यावयाचा आहे आणि त्याला दुकान मॉर्डगेज करावयाचे आहे. मनपाचा मालमता असल्याने त्याला दुकान गहाण ठेवण्यासाठी देता येणार नाही. कराराप्रमाणेच आपल्याला बाहेर जाता येणार नाही.

**भानुसिंग रावत** करारा नुसार त्यास स्विमींग पुल बांधण्यास परवानगी आहे काय हे सांगावे. तसेच तो कोणी त्याचा स्विमींग पुलाचा वापर करावा हेही आम्हाला सांगावे. त्यासाठी लागणारे पाणी कोणत्या ठिकाणावरुन घेण्यात येत आहे याचा खुलासा करावा.

**उप आयुक्त (विकास)** पाणी सोर्स कोठून घेण्यात येत आहे याची माहीती घेवून पुढील सभेत देण्यात येईल.

**महापौर** मनपाकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे भाडेकरुंच्या नावे करण्यासाठी अभय योजना हे तीन महिण्यासाठी सुरु करण्यता यावे सदरच्या अभय योजनेत रेडीरेकनरच्या 25% दर आकारुन भाडेकरुंचे नांव परिवर्तण करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.27** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे व महापालिका मालकीच्या जागेचे भाडेकरुंच्या नाव परिवर्तन करणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये कुठेही तरतुद नसल्यामुळे जे भाडेकरु भागीदारीत व्यवसाय करतात व भागीदारी संपुष्टात आल्यानंतर सदरील दुकान भागीदारीच्या वाटयाला आल्यास त्यांचे नांव भाडेपट्टीचे नांव परिवर्तन होत नाही या भाडेकरुंच्या अडचणी असल्यामुळे यापुर्वी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने ठराव पारीत करुन अभय योजना राबविली ज्यामुळे भाडेकरुंचे नांव परिवर्तन करण्यात आले व महापालिकेला आर्थीक उत्पन्न मिळाले.

तरी मनपाकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे भाडेकरुंच्या नावे करण्यासाठी अभय योजना हे तीन महिण्यासाठी सुरु करण्यता यावे सदरच्या अभय योजनेत रेडीरेकनरच्या 25% दर आकारुन भाडेकरुंचे नांव परिवर्तण करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.27** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत NUHM या शासनाच्या योजने अंतर्गत महानगरपालिके तर्फे अरब गल्ली, खडकपुरा, जंगमवाडी इतर ठिकाणी येथे दवाखान्याचे दुरुस्ती करण्यासाठी शासना तर्फे किती निधी प्राप्त झाला त्यापैकी उक्त दवाखान्यावर किती खर्च करण्यात आला व शिल्लक निधी किती आहे.

सदर योजने अंतर्गत प्राप्त निधी मधुन शिल्लक असलेल्या निधीत मनपाकेचा करबला दवाखान्यास रंगरंगोटी व दुरुस्ती करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- शबाना बेगम मो. नासेर **अनुमोदक**:- अ. लतीफ अ. मजीद

**<u>प्रशासकिय अहवाल</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान या शासनाच्या योजनेतंर्गत महानगरपालिके तर्फे अरबगल्ली, खडकपुरा, जंगमवाडी व हैदरबाग या ठिकाणी दवाखान्याची दुरुस्ती करण्यासाठी शासना तर्फे रुपये 38.58 लक्ष निधी प्राप्त असुन त्यापैकी अरबगल्ली, जंगमवाडी व हैदरबाग दवाखान्यावर रुपये 20.06 लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला व रुपये 18.52 इतका निधी शिल्लक आहे शिल्लक निधी पैकी रुपये 10.00 लक्ष खडकपुरा दवाखान्यासाठी व मा. आयुक्त मनपा नांदेड यांच्या निर्देशानुसार रुपये 8.52 लक्ष निधी जंगमवाडी दवाखान्यासाठी कार्यकारी अभियंता मनपा नांदेड यांच्याकडे प्रस्तावित आहे.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान योजनेतर्गत प्राप्त निधी हा केवळ अरबगल्ली, खडकपुरा, जंगमवाडी व हैदरबाग या ठिकाणी दवाखान्याची दुरुस्ती करण्यासाठी शासनातर्फे प्रशासकिय आर्थीक मान्यता प्राप्त आहे त्यामुळे सध्या NUHM अंतर्गत दुरुस्ती व देखभाल या शिर्षकाखाली निधी उपलब्ध नाही.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.28** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत NUHM या शासनाच्या योजने अंतर्गत महानगरपालिके तर्फे अरब गल्ली, खडकपुरा, जंगमवाडी इतर ठिकाणी येथे दवाखान्याचे दुरुस्ती करण्यासाठी शासना तर्फे किती निधी प्राप्त झाला त्यापैकी उक्त दवाखान्यावर किती खर्च करण्यात आला व शिल्लक निधी किती आहे.

सदर योजने अंतर्गत प्राप्त निधी मधुन शिल्लक असलेल्या निधीत मनपाकेचा करबला दवाखान्यास रंगरंगोटी व दुरुस्ती करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.28** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्यीतील ब्रम्हपुरी भागात बिएसयुपी योजने अंतर्गत अंदाजे रक्कम रुपये 95.00 कोटीचे कामे करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती सदर रक्कमच्या निविदे पैकी सदरील भागात विकास कामे करण्यासाठी कोण कोणते कामे करण्यात आली व कोणते शिल्लक आहे या बाबतचा सविस्तर लेखी अहवाल मनपा सर्वसाधारण सभेत सादर करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- अब्दुल सत्तार अ. गफुर, सय्यद शेर अली **अनुमोदक** :- अरशीया कौसर मो. हबीब

**अब्दुल सतार** ज्या ठिकाणी पाण्याची लाईन टाकण्यात आली आहे ती योग्य पध्दतीने टाकली नाही त्याची क्रास जोडणी करावयाची राहील आहे. ड्रेनेज लाईनचे काम शिल्लक राहीले याबाबतचे ही काम करुन दयावे. योजना बंद झाली तर काम होणार नाही का हेही सांगावे. त्याची एफडी जप्त करावी त्याला बील देण्यात येवू नये अशी सभागृहास विनंती आहे. काम रोखण्यात यावे.

**उप आयुक्त (विकास)** ड्रेनेजची जी कामे करावयाची आहे ती कंत्राटदाराकडून करुन घेण्याच्या संबंधीतास देवून काम करुन घेण्यात येईल सुरुवातीस 1600 घराचा डीपीआर होता आता 1080 घरे बांधण्याचे फ्रीज झालेले आहे त्यासाठी या घराच्या तुलनेत जो निधी खर्च करावयाचा तो करण्यात येणार आहे त्या पेक्षा जास्तीचा निधी खर्च करण्यात येणार नाही. कंत्राटदाराचे जोपर्यंत तो काम करणार नाही तो पर्यत त्यास बिल आम्ही देणार नाही.

**महापौर** श्री अ.सत्तार यांनी पुढील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव मांडला ब्रम्हपुरी भागात बिएसयुपी योजने अंतर्गत ज्या ठिकाणी पाण्याची लाईन टाकण्यात आली आहे ती योग्य पध्दतीने टाकली नाही त्याची क्रास जोडणी करावयाची राहील आहे. ड्रेनेज लाईनचे काम शिल्लक राहीले याबाबतचे ही काम करुन दयावे. योजना बंद झाली तर काम होणार नाही का हेही सांगावे. त्याची एफडी जप्त करावी त्याला बील देण्यात येवू नये अशी सभागृहास विनंती आहे. काम रोखण्यात यावे अशी विनंती केलेली असुन त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.29** **ठराव**

नावाशमनपा हद्यीतील ब्रम्हपुरी भागात बिएसयुपी योजने अंतर्गत अंदाजे रक्कम रुपये 95.00 कोटीचे कामे करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती सदर रक्कमच्या निविदे पैकी सदरील भागात विकास कामे करण्यासाठी कोण कोणते कामे करण्यात आली व कोणते शिल्लक आहे या बाबतचा सविस्तर लेखी माहिती प्रशासनाने सादर केलेली नाही ज्यामुळे सदरील भागात ज्या ठिकाणी पाण्याची लाईन टाकण्यात आली आहे ती योग्य पध्दतीने टाकली नाही त्याची क्रास जोडणी करावयाची राहील आहे. ड्रेनेज लाईनचे काम शिल्लक राहीले याबाबतचे ही काम करुन करण्यात येते. संबंधीत कंत्राटदाराची एफडी जप्त करावी व देय्यके अदाई करण्यात येवु नये सदरचे काम तात्काळ थांबविण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्रं. 01**

**विषय** :- श्री गुरुगोविंदसिंघजी यांची 350 वी जयंती साजरी करणे बाबत

**संदर्भ** :- 1) सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार यांचे सचिव श्री एन.के.सिंघ यांनी मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य. यांना दिलेले पत्र क्रं. 30-6/20/16 spl cell दि. 13 एप्रिल 2017

2) उप सचिव, महसुल व वन विभाग, यांनी मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी नांदेड यांना दिलेले पत्र क्रं. जीयुआर-2017/प्रक्र.176/ज-7अ महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई दि. 22 मे, 2017

3) मा.सचिव, सांस्क,तिक मंत्रालय भारत सरकार व मा. प्रधान सचिचव, महसुल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात आलेला प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साबांवि/14171/2017 दि. 21.12.2017

4) मा. संयक्त सचिव, सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार यांचे पत्र D.O.No.30-10/2016 Special Cell दिनांक 12.02.2018

5) कार्यालयीन पत्र NO. NWCMC/PWD/BLD/17310/2018 दिनांक 21.02.2018

6) मा. उपसचिव भारत सरकार यांचे पत्र F.No.30-10/2016 दिनांक 07 मार्च 2018

भारत सरकार मार्फत श्री गुरुगोविंदसिंघजी यांची 350 वी जन्मशताब्दी डिसेंबर 2016 ते डिसेंबर 2017 या कालावधीत साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मा. प्रधानमंत्री भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय समिती व मा. गृहमंत्री

भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली होती. कार्यकारी समितीच्या दिनांक 10.03.2017 च्या दुस-या बैठकीत श्री गुरुगोविंदसिंघजी यांचे नांदेड हे अंतीम निर्वाण स्थान असल्यामुळे त्यांचे स्मरणार्थ नांदेड येथे वास्तु व मुलभुत सुविधा निर्माण करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार, यांचे सचिवच श्री एन.के. सिंघ, यांनी संदर्भ क्रं. 1 च्या पत्रान्वये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना पत्र पाठवुन प्रकल्प निश्चित करुन त्यांचे डि.पी.आर सादर करण्यास कळविले होते.

संदर्भ क्रं. 02 च्या पत्रान्वये उपसचिव, महसुल व वन विभाग, यांनी मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी नांदेड यांना उक्त प्रकरणी तातडीने अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले होते.

या निमित्ताने शहरातील विविध विकास कामाचे रुपये 215.75 कोटीचे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार संदर्भ क्रं. 03 अन्वये मा. सचिव, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार व मा. प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा. संयुक्त सचिव, संस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भ क्रं. 04 अन्वये राष्ट्रीय कार्यकारी समितीने खालील प्रमाणे दान प्रकल्पनां तत्वत: मान्यता प्रदान करुन त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तात्काळ सादर करण्याकरिता सुचित केले होते.

1 Retrofitting of Building for Shri Guru Govind Singh Stadium at cost of Rs.42 Crore

2 Construction of Building for Shri Guru Govind Singh Adhyaan Sankul and Research Center at SRTM University at cost of Rs.25 Crore

श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम नुतनीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी महापालिकेचे नियुक्त सल्लागार फोरट्रेस फायनान्शीयन सर्व्हीसेस मुंबई यांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी कळविण्यात आले त्यानुसार त्यांनी रुपये 42,34,97,556/- या किमंतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला असुन त्यात खालील बाबींचा समावेश आहे.

| अ.क्र. | समाविष्ठ बाबी |
|---|---|
| 01 | मुख्य पॅव्हेलीयन इमारतीचे बांधकाम करणे तसेच दक्षिणेकडील प्रसार माध्यमासाठीच्या पॅव्हेलीयन इमारतीचा विकास करणे |
| 02 | सिटींग गॅलरीचा विकास करणे व अंतर्गत स्वच्छतागृहाचे बांधकाम, आसन व्यवस्था तसेच फल्ड लाईटची व्यवस्था तसेच उर्वरीत गॅलरीचे बांधकाम करणे |
| 03 | स्टेडीयम परिसरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचा विकास करणे, वाहनतळ व्यवस्था, सुरक्षा भिंत व प्रवेशव्दारे तसेच सिंथेटीक जॅगींग ट्रॅकतयार करणे |
| 04 | संकुला अंतर्गत अस्तित्वात असलेल्या बॅडमिंटन कोर्टचा विकास करणे या अंतर्गत सिंथेटीक प्लोरींग, आसन व्यवस्था, अकॉस्टीक, एअर कुलींग इत्यादी विकास कामे करणे |
| 05 | मैदानाच्या देखभालीसाठी आवश्यक यंत्रासामुग्री व साहित्य खरेदी करणे |
| 06 | मैदानाचे विधुतीकरण, पाणीपुरवठा व मलनिस्सारण विषयक कामे करणे |

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत श्री गुरुगोविंदसिंघजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र, उभारण्याकरिता रु. 25.00 कोटीची मान्यता असुन त्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यासाठी मा. कुलगुरु स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ नांदेड यांना कळविण्यात आले आहे.

संदर्भ क्रं. 06 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड साठी Retrofitting and Moderniztion of Guru Gobind Singh Stadium at Nanded Under the 350 the Birth Anniversary of Guru Gobind Singhji च्या कामासाठी रुपये 42,00,00,000/- इतका निधी मंजुर झालेला असुन त्यापैकी रुपये 21,00,00,000/- च्या पहिल हप्ता मनपास प्राप्त झालेला आहे. पत्रातील अटी व नियमातील अ.क्रं. 5 नुसार सदर कामासाठी निविदा प्रक्रिया हाती घेऊन सदरचे काम 18 महिण्यात कामे पुर्ण करण्याबाबत कळविले आहे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**महापौर** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.30** **ठराव**

**विषय** :- श्री गुरुगोविंदसिंघजी यांची 350 वी जयंती साजरी करणे बाबत

**संदर्भ** :- 1) सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार यांचे सचिव श्री एन.के.सिंघ यांनी मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य. यांना दिलेले पत्र क्रं. 30-6/20/16 spl cell दि. 13 एप्रिल 2017

2) उप सचिव, महसुल व वन विभाग, यांनी मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी नांदेड यांना दिलेले पत्र क्रं. जीयुआर-2017/प्रक्र.176/ज-7अ महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई दि. 22 मे, 2017

3) मा.सचिव, सांस्क,तिक मंत्रालय भारत सरकार व मा. प्रधान सचिचव, महसुल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात आलेला प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साबांवि/14171/2017 दि. 21.12.2017

4) मा. संयक्त सचिव, सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार यांचे पत्र D.O.No.30-10/2016 Special Cell दिनांक 12.02.2018

5) कार्यालयीन पत्र NO. NWCMC/PWD/BLD/17310/2018 दिनांक 21.02.2018

6) मा. उपसचिव भारत सरकार यांचे पत्र F.No.30-10/2016 दिनांक 07 मार्च 2018

भारत सरकार मार्फत श्री गुरुगोविंदसिंघजी यांची 350 वी जन्मशताब्दी डिसेंबर 2016 ते डिसेंबर 2017 या कालावधीत साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मा. प्रधानमंत्री भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय समिती व मा. गृहमंत्री भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली होती. कार्यकारी समितीच्या दिनांक 10.03.2017 च्या दुस-या बैठकीत श्री गुरुगोविंदसिंघजी यांचे नांदेड हे अंतीम निर्वाण स्थान असल्यामुळे त्यांचे स्मरणार्य नांदेड येथे वास्तु व मुलभुत सुविधा निर्माण करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार, यांचे सचिवच श्री एन.के. सिंघ, यांनी संदर्भ क्रं. 1 च्या पत्रान्वये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना पत्र पाठवुन प्रकल्प निश्चित करुन त्यांचे डि.पी.आर सादर करण्यास कळविले होते.

संदर्भ क्रं. 02 च्या पत्रान्वये उपसचिव, महसुल व वन विभाग, यांनी मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी नांदेड यांना उक्त प्रकरणी तातडीने अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले होते.

या निमित्ताने शहरातील विविध विकास कामाचे रुपये 215.75 कोटीचे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार संदर्भ क्रं. 03 अन्वये मा. सचिव, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार व मा. प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा. संयुक्त सचिव, संस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भ क्रं. 04 अन्वये राष्ट्रीय कार्यकारी समितीने खालील प्रमाणे दान प्रकल्पनां तत्वतः मान्यता प्रदान करुन त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तात्काळ सादर करण्याकरिता सुचित केले होते.

1 Retrofitting of Building for Shri Guru Govind Singh Stadium at cost of Rs.42 Crore

2 Construction of Building for Shri Guru Govind Singh Adhyaan Sankul and Research Center at SRTM University at cost of Rs.25 Crore

श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम नुतनीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी महापालिकेचे नियुक्त सल्लागार फोरट्रेस फायनान्शीयन सर्व्हीसेस मुंबई यांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी कळविण्यात आले त्यानुसार त्यांनी रुपये 42,34,97,556/- या किमंतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला असुन त्यात खालील बाबींचा समावेश आहे.

| अ.क्र. | समाविष्ठ बाबी |
|---|---|
| 01 | मुख्य पॅव्हेलीयन इमारतीचे बांधकाम करणे तसेच दक्षिणेकडील प्रसार माध्यमासाठीच्या पॅव्हेलीयन इमारतीचा विकास करणे |
| 02 | सिटींग गॅलरीचा विकास करणे व अंतर्गत स्वच्छतागृहाचे बांधकाम, आसन व्यवस्था तसेच फल्ड लाईटची व्यवस्था तसेच उर्वरीत गॅलरीचे बांधकाम करणे |
| 03 | स्टेडीयम परिसरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचा विकास करणे, वाहनतळ व्यवस्था, सुरक्षा भिंत व प्रवेशव्दारे तसेच सिंथेटीक जॅगींग ट्रॅकतयार करणे |
| 04 | संकुला अंतर्गत अस्तित्वात असलेल्या बॅडमिंटन कोर्टचा विकास करणे या अंतर्गत सिंथेटीक प्लोरींग, आसन व्यवस्था, अकॉस्टीक, एअर कुलींग इत्यादी विकास कामे करणे |
| 05 | मैदानाच्या देखभालीसाठी आवश्यक यंत्रासामुग्री व साहित्य खरेदी करणे |
| 06 | मैदानाचे विधुतीकरण, पाणीपुरवठा व मलनिस्सारण विषयक कामे करणे |

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत श्री गुरुगोविंदसिंघजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्र, उभारण्याकरिता रु. 25.00 कोटीची मान्यता असुन त्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यासाठी मा. कुलगुरु स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ नांदेड यांना कळविण्यात आले आहे.

संदर्भ क्रं. 06 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड साठी Retrofitting and Moderniztion of Guru Gobind Singh Stadium at Nanded Under the 350 the Birth Anniversary of Guru Gobind Singhji च्या कामासाठी रुपये 42,00,00,000/- इतका निधी मंजुर झालेला असुन त्यापैकी रुपये 21,00,00,000/- च्या पहिल हप्ता मनपास प्राप्त झालेला आहे. पत्रातील अटी व नियमातील अ.क्रं. 5 नुसार सदर कामासाठी निविदा प्रक्रिया हाती घेऊन सदरचे काम 18 महिण्यात कामे पुर्ण करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेला**

**नगरसचिव** मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्रं. 2018/पुवि/प्रशा/टे-7/सिआर जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड दिनांक 26.03.2018 अन्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या 02 अशासकीय सदस्यांच्या नियुक्ती करण्यासाठी कळविण्यात आलेले आहे.

**सभागृहनेता** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या 02 सदस्य **श्री जाधव श्रीनिवास नारायण व सौ. कल्याणकर ज्योती किशन** यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्ती करुन जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पाठविण्यास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** सभागृहनेता यांनी सुचविल्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या 02 सदस्य **श्री जाधव श्रीनिवास नारायण व सौ. कल्याणकर ज्योती किशन** यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्ती करुन जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पाठविण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.31** **ठराव**

मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्रं. 2018/पुवि/प्रशा/टे-7/सिआर जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड दिनांक 26.03.2018 अन्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या 02 अशासकीय सदस्यांच्या नियुक्ती करण्यासाठी कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या 02 सदस्य **श्री जाधव श्रीनिवास नारायण व सौ. कल्याणकर ज्योती किशन** यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्ती करुन जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पाठविण्यास हि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**विषय -** **प्रस्ताव**

श्रीमती संगिता नामेवार हया जिल्हा परिषद, नांदेड येथील शिक्षण आस्थापणेवर सहशिक्षीका या पदावर येथे दि. 03.07.2003 पासुन कार्यरत आहेत. संबंधितांच्या वैयक्तीक अडचणीमुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड येथील शिक्षण आस्थापणेवर एकतर्फी बदलीने येण्यासाठी विनंती केलेली आहे.

करिता संबंधिताच्या विनंती अर्जानुसार संबंधितांची नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड येथे शिक्षण आस्थापणेवर एकतर्फी बदली करण्यासाठी हा प्रस्ताव नावाशमनपा सर्व साधारण सभेसमोर सादर

**सुचक**:- स.विरेद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक**:- विनय पाटील

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं. 32** **ठराव**

श्रीमती संगिता नामेवार हया जिल्हा परिषद, नांदेड येथील शिक्षण आस्थापणेवर सहशिक्षीका या पदावर येथे दि. 03.07.2003 पासुन कार्यरत आहेत. संबंधितांच्या वैयक्तीक अडचणीमुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड येथील शिक्षण आस्थापणेवर एकतर्फी बदलीने येण्यासाठी विनंती केलेली आहे.

करिता संबंधिताच्या विनंती अर्जानुसार संबंधितांची नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड येथे शिक्षण आस्थापणेवर एकतर्फी बदली करण्यासाठी ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय -** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड सर्वसाधारण सभा दि. 05.08.2015 अन्वये ठराव क्रं 66 I.T.I. चौक जवळ महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणीकरिता मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रं संकीर्ण 2009/(5/09) दि.17 ऑगस्ट 2009 अन्वये सि.टी.सर्वे क्रं 74/1 मधिल नांदेड शहरातील औदयोगीक प्रशासकीय संस्थे कडुण 150.चौ.मी जागा महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणी करण्याकरीता नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेस हस्तांतरीत झाली आहे. करिता सदरील जागेवर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणी करण्याकरीता हि सर्वसाधारण सभा पुन:श्च मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**सुचक** :- स.विरेंद्रसिंघ गाडीवाले, दुष्यंत सोनाळे **अनुमोदक** :- आनंद चव्हाण, दयानंद वाघमारे

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.33** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड सर्वसाधारण सभा दि. 05.08.2015 अन्वये ठराव क्रं 66 I.T.I. चौक जवळ महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणीकरिता मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रं संकीर्ण 2009/(5/09) दि.17 ऑगस्ट 2009 अन्वये सि.टी.सर्वे क्रं 74/1 मधिल नांदेड शहरातील औदयोगीक प्रशासकीय संस्थे कडुण 150.चौ.मी जागा महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणी करण्याकरीता नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेस हस्तांतरीत झाली आहे. करिता सदरील जागेवर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुर्णाकृती पुतळे उभारणी करण्याकरीता हि सर्वसाधारण सभा पुन:श्च मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय -** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड व सप्तरंग सेवाभावी संस्था, अरिहंत चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय पातळवर इंटरनॅशनल यांच्या वतीने राष्ट्रीय शास्त्रीय नृत्य व अंतरराष्ट्रीय लोकनृत्य महोत्सवचे कार्यक्रम दिनांक 02 जुन ते 05 जुन 2018 पर्यंत नावाशमनपाकेच्या शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे करण्यासाठी विनामुल्य निशुल्क देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- तेहरा अमितसिंह

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.34** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड व सप्तरंग सेवाभावी संस्था, अरिहंत चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय पातळवर इंटरनॅशनल यांच्या वतीने राष्ट्रीय शास्त्रीय नृत्य व अंतरराष्ट्रीय लोकनृत्य महोत्सवचे कार्यक्रम दिनांक 02 जुन ते 05 जुन 2018 पर्यंत नावाशमनपाकेच्या शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे करण्यासाठी विनामुल्य निशुल्क देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**महापौर** आजच्या सभा संपल्यामुळे लगेचच दिनांक 31.03.2018 रोजी सर्वानुमते तहकुब करण्यात आलेली मनपाकेची अर्थसंकल्पीय विशेष सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येत आहे

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| **नावाशमनपा नांदेड** | **नावाशमनपा नांदेड** |